सायंदैनिक
प्राजक्त


श्रीपरशुराम


श्रीकोळेश्वर


श्रीयोगेश्वरी

भावे मित्र मंडळाचे द्वै मासिक

# ‘भावे-प्रयोग’

भावे मित्र मंडळ
एक परिवार

भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक मे २०२५

**कुलवृत्तांताचे काम सुरू होऊन दीड वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. अनेकांचे कुलवृत्तांताचे फॉर्म अजून आलेले नाहीत. सर्व भावे कुलबंधू आणि माहेरवाशिणींना विनंती की, कुलवृत्तांताचे काम लवकरात लवकर संपावे यासाठी ज्यांनी फॉर्म भरून पाठवलेले नाहीत त्यांनी ते तात्काळ भरून पाठवावेत. कुलवृत्तांत प्रकाशित करण्याचे भावे मित्र मंडळाने ठरविल्यानंतर आपले फॉर्म राहून गेल्यास नंतर ती माहिती कुलवृत्तांतात नंतर समाविष्ट करता येणार नाही याची नोंद घ्यावी. फॉर्म या पत्यावर पाठवावेत. – भावे मित्र मंडळ, द्वारा एल.डी. भावे अँड सन्स १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.**

## कौशिक गोत्री, चित्पावन भावे कुलाचा कुलवृत्तांत

भावे मित्र मंडळ स्थापन होऊन नंतर २००६ मध्ये भावे मित्र मंडळाची नोंदणी झाली. भावे मित्र मंडळाचे द्वैमासिक प्रकाशित होऊ लागले. भावे मंडळींचे अनेक पत्ते मंडळाकडे उपलब्ध झाले. ह्या द्वैमासिकातून छोट्याशा चौकटीतून कुलवृत्तांतासंबंधात काम करता येईल का, अशी विचारणा सतत होत असे. प्रत्यक्षात काहीच घडत नव्हतं. मार्च २०२० मध्ये कोरोनामुळे लॉकडाऊन आलं. त्यावेळेला मी असा विचार केला की १९९१ सालचा कुलवृत्तांत जर पुन्हा जसाच्या तसा टाईप करून ठेवला तर नंतर त्यामध्ये नवीन आलेली माहिती आपल्याला घेता येईल. माझा पूर्वी प्रकाशनाचा व्यवसाय असल्याने व दर दोन महिन्याने प्रकाशित होणारे आपले नियतकालिकाचे काम मी माझ्याकडेच करीत असल्याने कुलवृत्तांतासाठी काय करावे लागेल याची मला कल्पना आली व मी कुलवृत्तांताचे काम हळूहळू सुरू केले. आत्ता कुलवृत्तांताच्या माहितीचा ६० ते ७० टक्के भाग पूर्ण झाला आहे. आता नवीन माहिती येणे आवश्यक आहे. त्यासाठी एक फॉर्म तयार केला आहे. तो फॉर्म पान क्रमांक ३ वर छापला आहे. - अभय शंकर भावे.

### भावे कुलवृत्तांताचा फॉर्म भरताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे ..

१) प्राजक्तच्या या अंकात दिलेला फॉर्म सर्वांनी भरून पाठवायचा आहे. २) सर्वप्रथम कुलवृत्तांतातील आपल्या घराण्याच्या नोंदी पहाव्यात. कुलवृत्तांतात नाव सापडत नसेल तर आपल्या वडिलांचे, आजोबांचे व पणजोबांचे पूर्ण नाव अभय शंकर भावे यांना कळवलेत तर ते कुलवृत्तांतातील त्या पानाचा फोटो पाठवतील. ३) आपल्या घरातील कोणत्या व्यक्तीपर्यंतची माहिती आली आहे, ते पहावे. ज्या सदस्यांबद्दल ‘माहिती उपलब्ध नाही’ असे लिहिले आहे, त्यांचीही माहिती वेगळ्या फॉर्ममध्ये लिहून पाठवायची आहे. ४) १९९१ साली कुलवृत्तांत छापल्यानंतर आपल्या घरात झालेली लग्नं, नवीन जन्मलेले सदस्य, अगदी तान्ह्या मुलांची सुद्धा माहिती, तसेच घरातील सदस्यांचे झालेले मृत्यू, यांची माहिती भरायची आहे. १९९१ सालानंतर आपल्या आयुष्यातले बदल जसे नोकरी, रिटायरमेंट याबद्दलही माहिती लिहायची आहे. ५) घरातल्या प्रत्येक व्यक्तीचा वेगळा फॉर्म भरायचा आहे. कारण त्यात प्रत्येकाची जन्मतारीख, शिक्षण, प्रत्येकाचा व्यवसाय नोकरी याची वेगळी वेगळी माहिती भरायची आहे. त्यासाठी प्राजक्तमध्ये आलेल्या फॉर्मच्या, घरातील संख्येप्रमाणे झेरॉक्स काढाव्यात. ६) आपल्या मुलींची लग्ने झाली असल्यास त्यांचं आधीचं नाव, आत्ताचं नाव, शिक्षण, नोकरी आणि लग्नानंतरचा तिचा पत्ता, याबद्दलची माहिती वेगळ्या फॉर्मवर द्यायची आहे. ७) आईवडील हयात नसल्यास बहिणींची किंवा आत्यांची माहिती भावांनी वेगवेगळ्या फॉर्ममध्ये लिहून पाठवावी. ८) भावे घराण्यातील स्त्रियांनी/म्हणजे सासू आणि सुनांनी, फॉर्म भरताना, घराणे लिहावे, कुलवृत्तांतातील पान क्रमांक लिहावा. त्यानंतर पणजोबांचे, आजोबांचे नाव आणि व्यक्तीचे नाव, इथे काहीच लिहायचे नाही. ‘पत्नीचे नाव’ पासून त्यांनी आपली माहिती लिहावी. त्यात, स्वत:च्या नावानंतर माहेरचे पूर्ण नाव लिहावे व पुढील माहिती भरावी. ९) हयात नसलेल्यांच्या मृत्युचे दिनांकही द्यायचे आहेत. आपापले फॉर्म भरून झाल्यानंतर, आपल्या नातेवाईकांना, तसेच आपल्या जवळपास रहाणाऱ्या भाव्यांनाही याची माहिती द्यावी आणि लवकरात लवकर फॉर्म भरून पाठवण्यास उद्युक्त करावे.

यासंदर्भात कुठलीही शंका असल्यास श्री. अभय शंकर भावे ९४२२३०६०३३/७०२०६४५८९२ यांच्याशी संपर्क करावा. फॉर्म पोस्टाने खालील पत्त्यावर पाठवावेत. **भावे मित्र मंडळ, द्वारा एल.डी.भावे अँड सन्स, १२४४, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.**

ई-मेलने फॉर्म पाठवायचे असतील तर bhave1956@gmail.com या ई-मेल वर पाठवावेत.

# संपादकीय

**भावे कुलवृत्तांताचे काम सुरू होऊन आता दीड वर्ष होऊन गेले आहे. कुलवृत्तांताचे फॉर्म भरून द्या अशी विनंती केल्यावर काहीजण कधीपर्यंत फॉर्म भरून दिले तर चालतील असे विचारतात. याला मुदत नसली तरी हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी फॉर्म तात्काळ भरावेत.**

**अद्याप अनेक भावे कुटुंबियांचे कुलवृत्तांताचे फॉर्म येणे शिल्लक आहे. आमची माहिती मागच्या कुलवृत्तांतात आहे. आता पुन्हा फॉर्म कशाला भरून हवेत? असे प्रश्न विचारले जातात. १९९१ सालच्या नंतर त्या माहितीत अनेक बदल झाले असणारच ना? म्हणून नव्याने फॉर्म भरणे आवश्यक आहे.**

**आपले घराणे कोणते? कुलवृत्तांतात नाव आहे की नाही? याचा विचार न करता फॉर्म भरून पाठवावेत, घराणे शोधण्याचे काम कुलवृत्तांताचे काम करणारे करतीलच. भावे कुलवृत्तांताचे फॉर्म भरून पाठवण्यासाठी तासाभराचाच अवधी लागतो, त्यामुळे वेळ काढून कुलवृत्तांताचे फॉर्म भरून पाठवावेत. सर्वांनी आपले फॉर्म भरताना आपल्या मागील पिढीचेही अपडेटस भरून पाठवावेत. तसेच प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र फॉर्म भरावा म्हणजे कुलवृत्तांतात सर्व माहिती समाविष्ट होईल. कुलवृत्तांताचा फॉर्म भरण्यासंबंधीची अधिक माहिती पान क्र १ वर व भरून द्यायचा फॉर्म पान क्र ३ वर आहे.**

Unsung Heros गाऊ त्यांना आरती! अनेक अलौकिक, दुर्मिळ गुणवत्ता असलेल्या भावे कुलातील व्यक्ती केवळ प्रसिद्धीचे कोंदण न लाभल्यामुळे विस्मृतीत गेल्या. अशा व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देणारे हे सदर आहे. या लेखमालिकेतून भावे कुलात आपल्या कार्यकर्तृत्वाने विविध क्षेत्रात ज्यांनी आपला ठसा उमटवला अशा व्यक्तींची माहिती देण्याच्या या उपक्रमाला वाचकांची पसंती असल्याचे त्यांच्या येणाऱ्या प्रतिक्रियांमुळे लक्षात येते आहे. अशा व्यक्तींची माहिती आम्हास लिहून पाठवावी, म्हणजे ती पुढील अंकांमधून प्रकाशित करता येईल व कुलवृत्तांतातही समाविष्ट करता येईल.

'उद्योजक म्हणून घडताना' ही भाव्यांमधील व्यावसायिकांनी आपण व्यवसाय का करू लागलो, त्या मागची प्रेरणा कोणाची, व्यवसाय करताना अडचणी काय आल्या अशा अनुभव कथनाची ही लेखमाला आहे. आपले व्यावसायिक अनुभव मराठी, इंग्रजी, हिंदी या कोणत्याही भाषेतून साधारण १००० ते १२०० शब्दांत लिहून bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावेत. व्यवसायात नव्याने येणाऱ्या भावी पिढीसाठी हे अनुभव निश्चित मार्गदर्शक ठरतील. अनेकांना लिखाणाची सवय नसते अशांनी ऑडियो रेकॉर्डिंग करून ते पाठविल्यास त्यावरूनही लेख तयार करून घेता येईल.

'भावे-प्रयोग'या प्राजक्ततर्फे प्रकाशित होणाऱ्या अंकात आपला सहभाग लिखाणाच्या रूपाने हवा आहे. आपल्यात सिद्धहस्त लेखक आणि कवी आहेत, त्यांचेही साहित्य प्रकाशित करायची संधी मिळावी असे आवाहन याद्वारे मी करीत आहे. अनेकांना मी भेटत असतो, त्यावेळी त्यांना तुम्ही तुमच्या पद्धतीने लिहून द्या, त्यावर संपादकीय संस्कार करून, लिखाण व्यवस्थित करून घेईन असे मी सांगत असतो. त्यामुळे आपल्याला सुचलेल्या विषयावरील लिखाण जरूर पाठवावे, ही विनंती.

**अभय शंकर भावे**

७०२०६४५८९२/९४२२३०६०३३ Whats App

**'भावे मित्र मंडळ–एक परिवार'** ही संस्था २००६ मध्ये नोंदणीकृत झाली असून त्याचा नोंदणी क्रमांक MAH/357/2006 हा आहे.

## अंकाबद्दल प्रतिक्रिया

माननीय संपादक,

प्राजक्त मार्च २०२५ चा अंक मिळाला,

'भावे प्रयोगा'मध्ये खूप वेगवेगळे विषय हाताळले आहेत, भाव्यांच्याकडे किती वेगवेगळ्या विषयातील प्रतिभा आहेत हे यावरून समजते.

डॉ. सरिता विनय भावे यांचा काश्मीर विषयी लेख छान आहे, असे काश्मीर जे माहितीत नाही, ज्यामध्ये हिंदू आणि बौद्ध संस्कृतीचे पुरावे आहेत.

उदय कृष्ण भावे यांचा कृत्रिम बुद्धिमत्ता यावरील लेख सुंदर आहे, त्यांनी अगदी सोप्या भाषेत या विषयाची मांडणी केली आहे, यावरून उदय भावे यांची या क्षेत्रातील उच्च प्रतिभा समजते. कारण सोपे करणे ही जगातील सर्वात अवघड गोष्ट आहे.

भेटी लागी जीवामध्ये डॉ.शिरीष सुरेश भावे यांनी भेट देणे घेणे हे गमतीदारपणे मांडले आहे, खरंच काही वेळा मी सुद्धा भेट पुढे सरकवतो. शर्वरी भूषण भावे यांनी सिद्धांताचा विषय मांडला आहे, सुंदर परंतु सगळ्या सिद्धांतांनी माझ्यासारख्या खूप जणांना भयंकर त्रास दिला आहे. परंतु सिद्धांतांनी आयुष्य सुकर केले हे मात्र नक्की.

वेदमूर्ती श्री. विनायक दामोदर भावे, डॉ. भूषण विठ्ठल भावे, स्वप्नील दिनेश भावे यांचे हार्दिक अभिनंदन.

असे अंक तयार करण्यासाठी संपादकीय मंडळाने घेतलेल्या विशेष प्रयत्नांसाठी अभिनंदन. **आशिष रमेश भावे, पुणे.**

प्राजक्तचा मार्च २५ चा अंक मिळाला. खूप छान माहितीपूर्ण लेख आहेत. भावे मित्र मंडळाचे कार्यकारिणी सदस्य करीत असलेल्या कामाबद्दल त्यांना धन्यवाद. तसेच लेखकांना देखील धन्यवाद.

**सौ. स्मिता चिंतामणी भावे, ठाणे.**


## 'भावे-प्रयोग'मध्ये द्यायच्या जाहिरातींचे दर

पाव पान रु. ५,००/- अर्धे पान रु. १,०००/- पूर्ण पान रु २,०००/-
संपूर्ण अंक प्रायोजकत्त्वाचे रु. १०,०००/-
रंगीत आवृत्तीचे दर दुप्पट राहतील.

**आपल्या व्यवसायाची जाहिरात भावे-प्रयोगमध्ये जरूर द्यावी ही विनंती.**


पोस्टाने पाठवलेला अंक न मिळण्याचे प्रमाण भरपूर आहे. अंक ई मेलने पाठविण्याचा प्रयोग चांगलाच यशस्वी ठरतो आहे. असाही एक सूर ऐकू आला की व्हॉटस् ॲपवर अंक पाठवा, पण ते शक्य नाहीये हे लक्षात घेऊनच ई-मेलचा मार्ग निवडला आहे. त्यासाठी कुटुंबातील सर्वांचे मेल ॲड्रेस पाठवावेत. अजूनही अनेकांचे मेल ॲड्रेस उपलब्ध झालेले नाहीत, तरी आपले मेल ॲड्रेस bhave1956@gmail.com या मेलवर कळवावेत म्हणजे पुढील अंक मेलनेही पाठवता येतील. मेल करताना आपल्या संपूर्ण नावासह पूर्ण पत्ता व फोन नंबरही कळवावा.

# कौशिक गोत्री, चित्पावन, भावे कुलाच्या कुलवृत्तांतासाठी फॉर्म

**हा फॉर्म कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने किंवा प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्रपणे भरायचा आहे.**
**विवाहित स्त्रियांनी फॉर्म भरताना आपल्या पूर्ण नावासह पूर्वीचेही नाव लिहावे.**

कुलवृत्तांताप्रमाणे घराणे : .............................. कुलवृत्तांतातील पान क्रमांक ......................
(घराणे व पान क्रमांक माहिती नसल्यास किंवा सापडला नाही तर तसे लिहावे.)
मूळगाव : ..................
पणजोबांचे संपूर्ण नाव : .............................. आजोबांचे संपूर्ण नाव : ............................
वडिलांचे संपूर्ण नाव : ........................................................................
व्यक्तीचे संपूर्ण नाव : ........................................................................
पत्नीचे संपूर्ण नाव : ..........................................................................
मुलगे व मुलींची संपूर्ण नावे : ...................................................................
...............................................................................................
पत्ता : .......................................................................................
...............................................................................................
शहर/गाव ............................ पिन कोड क्र. .............................
जन्म दिनांक ......................... शिक्षण : ........................................................
फोन नं. एस.टी.डी कोड सहित. ...................... मोबाईल नं. : ....................................
व्हॉटस्‌ॲप नं. :.............................. ई-मेल : ................................................
नोकरी/व्यवसायाबद्दल व आपल्या आयुष्यातील विविध प्रगतीविषयी माहिती द्यावी.
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................
...............................................................................................

स्वाक्षरी

# ये कश्मीर है - लेख क्र. ३
# जिव्हाळ्याचे आदि शंकराचार्य मंदिर!

© डॉ. सरिता विनय भावे, मुंबई.
छायाचित्र क्रेडिट
डॉ. सरिता विनय भावे, संदर्भ.


काश्मीर पर्यटनात नेहमीचे सोनमर्ग, गुलमर्ग, पहलगाम सर्वच पर्यटक करतात आणि ते तसे करायलाही हवे. पण काश्मीरच्या या 'आऊट ऑफ धिस वर्ल्ड' सौंदर्याची आपल्या डोळ्यांवर, आपल्या अंतरात्म्यावर इतकी नशा चढते की काश्मीरबद्दल इतर काही माहिती करून घ्यावी ही चाहच आपल्या मनात निर्माण होत नाही. म्हणूनच जानेवारी २०२५ पासून आपण काश्मीरच्या काही 'ऑफ बीट' पर्यटन स्थळांची रोचक माहिती देणारी लेखमाला सुरू केली आहे. त्या मालिकेतील हा तिसरा लेख!

बागा, सरोवरे, हिमशिखरांचे 'टिपिकल' काश्मीर पर्यटन अथवा प्राचीन, सांस्कृतिक अशा 'ऑफ बीट' काश्मीरचे पर्यटन, दोघांतील 'कॉमन फॅक्टर' असतो श्रीनगरच्या आदि शंकराचार्य मंदिराला दिलेली भेट! श्रीनगरपासून पाच कि. मी. अंतरावर आणि समुद्रसपाटीपासून साधारण ११०० फूट (३३५ मीटर) उंचावर असलेल्या टेकडीवर असलेले हे मंदिर श्रीनगर शहरात प्रवेश केल्याबरोबर पर्यटकाचे लक्ष वेधून घेते. मंदिराच्या






पायथ्यापर्यंत पोचण्यासाठी बॉर्डर रोडस ऑर्गनायझेशनने (BRO) कार पार्किंगसाठी जागा देऊन मोटरेबल रस्ता तयार केला आहे. ऊन वाढण्याअगोदर सुरुवात केली तर फारसा त्रास न होता चुटकीसरशी इथल्या २४३ पायऱ्या चढून आपण मंदिर परिसरात पोचू शकतो. शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त व मनात जोश असणारी मंडळी श्रीनगर मधील निवासस्थानापासून कार ऐवजी इथपर्यंत, थंडगार हवेत चालत येऊन, आजूबाजूच्या सुंदर निसर्गाचा आस्वाद घेत 'मिनी ट्रेक'चे 'ॲडव्हेंचर'सुद्धा पदरात पाडून घेऊ शकतात! या टेकडीवरून एका बाजूला झेलम नदी आणि विस्तीर्ण दल सरोवरात विसावलेले शिकारे तर दुसऱ्या बाजूला हिमाच्छादित पर्वतराजी आणि घनदाट जंगल यांचे विहंगम दृश्य पाहणे अविस्मरणीय ठरते!







अनादी काळापासून ही टेकडी आणि वास्तुकलेच्या दृष्टीने हे मंदिर काश्मीरमधील सर्वात पवित्र आणि प्राचीन मानले गेले आहेत. भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते ही टेकडी ज्वालामुखीच्या उद्रेकाने तयार झालेल्या 'कंजूर' खडकापासून बनलेली आहे. धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर स्थापत्यशास्त्राचा एक अद्‌भुत नमुना म्हणूनही या मंदिराला खूप महत्त्व आहे. या मंदिराच्या रचनेत सुप्रसिद्ध काश्मीरी वास्तुकलेची अष्टकोनी शैली आणि वैशिष्ट्यपूर्ण घोड्याच्या नालेच्या आकाराची कमान प्रतिबिंबित झालेली दिसते. एका भक्कम खडकावर मंदिर उभारलेले असून वीस फुटी अष्टकोनी पाया, वरच्या चौकोनी इमारतीला आधार देतो. अष्टकोनाच्या सर्व बाजू समान असून पुढचा, मागचा आणि बाजूचा भाग साधा आहे. तर इतर चार बाजूंना किमान डिझाइन लक्षात येण्याजोगे कोन आहेत. मंदिराच्या गर्भगृहापर्यंत पोचण्यासाठीच्या पायऱ्या तीन टप्प्यांत विभागल्या आहेत. बाहेरून चौरसाकृती असलेले गर्भगृह आतून वर्तुळाकार आहे. मंदिराच्या छताला चार अष्टकोनी स्तंभांनी आधार दिला आहे. गाभाऱ्यातील शिवलिंग भव्य असून ते विशाल सर्पाने वेढलेले आहे. मंदिराचे शिखर घुमटाकार असून त्याला 'कंजूर' दगडाच्या आडव्या तुळयांचा आधार लाभला आहे.





शतकानुशतके या टेकडी आणि मंदिराला अनेक नावे बहाल झाली असून याच्या बांधकामाच्या कालखंडाबाबतही अनेक प्रवाद आहेत. आज या मंदिराला 'शंकराचार्य मंदिर' म्हणत असले तरी काश्मीरी पंडितांची अशी ठाम श्रद्धा होती की या टेकडीचे मूळ नाव 'संधिमान पर्वत' आणि मंदिराचे मूळ नाव 'ज्येष्ठेश्वर' होते. त्यांच्या मते इ. स. पूर्व २२० मध्ये अशोकाचा मुलगा 'जालोक'चे इथे साम्राज्य असताना त्याने हे मंदिर उभारले होते. कल्हणने 'राजतरंगिणी' मध्ये या टेकडीला 'जीतलार्क', 'जेठालारक' आणि नंतर 'गोपादरी' किंवा 'गोपा टेकडी' असे म्हटले आहे. राजा गोपादित्य (इ. स. पूर्व ४०० - इ. स. पूर्व ३४०) ने इ. स. पूर्व ३७१ मध्ये ज्येष्ठेश्वराचे मंदिर उभारले (किंवा त्याचा जीर्णोद्धार केला) आणि स्वत:चे नाव टेकडीला दिले असावे, असेही तो लिहितो (आज सुद्धा या मंदिराच्या जवळच्या एका खेड्याचे नाव 'गुपकार' आहे). तसेच मूळ काव्यात महादेवाचा उल्लेख 'ज्येष्ठ रूद्र' असा केलेला असून त्याचाही अर्थ 'ज्येष्ठेश्वर' अथवा 'सर्वशक्तीमान परमेश्वर'शी मिळताजुळता आहे. पुढे राजा ललितादित्य मुक्तापीडाने (इ. स. ७०१ - इ. स. ७३७) याची डागडुजी केली होती.



संदर्भ २

'बुतशिकन'(मूर्तिभंजक) सुलतान सिकंदर शाह मिरी (इ. स. १३५३ - इ. स. १४१३) च्या तावडीतून हे मंदिर सहीसलामत बचावले, हे मात्र एक सुखद आश्चर्यच म्हणायला हवे! पूर्वी मंदिराच्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंना इ. स. १६४४ आणि १६५९ सालातील (मोगल बादशाह शाहजहान याचा कालखंड) पर्शियन भाषेत कोरलेले शिलालेख होते. त्यावरून काही विदेशी संशोधकांनी याच्या बांधकामाचा कालावधी १७ - १८ व्या शतकापर्यंत नेऊन ठेवला होता. परंतु 'राजतरंगिणी' चे इंग्रजीत भाषांतर करणारे 'ऑरिएल स्टीन' यांच्या मते मंदिराची अधिरचना अलीकडची असली तरी पाया आणि पायऱ्या मात्र नक्कीच खूप प्राचीन आहेत. भारतीय पुरातत्व विभागाच्या इथल्या माहिती फलकावर, शैलीगत वैशिष्ट्यांनुसार मंदिर उभारणीचा कालावधी ६ व्या - ७ व्या शतकातील असावा अशी शक्यता वर्तवली आहे.

बौद्धधर्मीय या मंदिराला 'पास - बहार' (कधी 'पास - पहार' असाही उल्लेख) असे संबोधतात. इस्लामच्या आगमनापूर्वी सुलेमान नावाच्या व्यक्तीने (सॉलोमन, सँडीमन प्रतिनावे) ही टेकडी जिंकली होती. हा सर्व प्रदेश त्याच्या अधिपत्याखाली होता. आपले अनुयायी आणि सिंहासनासकट सुलेमान इथपर्यंत पोचला होता. तेव्हापासून मंदिराला पर्शियन आणि मुस्लिम धर्माशी जोडलेली 'तख्त-ए-सुलेमान', 'कोह-ए-सुलेमान' अशी नावे मिळाली. 'संधिमान' पर्वताच्या नावाच्या उच्चारातील साधर्म्यावरून या टेकडीला 'तख्त -ए- सुलेमान' असे म्हणतात असा सुद्धा प्रवाद आहे. कल्हणच्या 'राजतरंगिणीत', 'युझ असफ' नावाचा एक पैगंबर गोपादरी टेकडीवर आला आणि त्याने मंदिराचा जीर्णोद्धार केला असा उल्लेख आला आहे. हरवलेल्या ज्यूंच्या शोधात आलेले हे 'युझ असफ' दुसरे तिसरे कोणी नसून स्वत: येशू होत. तथापि याबाबतीत ठोस पुरावा नसल्याने बहुतेक संशोधकांना हे सर्व काल्पनिक आणि विवादास्पद वाटते.

काश्मीरी पंडितांचा असा ठाम विश्वास होता की, बौद्ध धर्माच्या वर्चस्वामुळे झाकोळून गेलेल्या सनातन धर्माचे या क्षेत्रात पुनरुज्जीवन करण्यासाठी द. भारतातील त्रावणकोर येथील अद्वैतवादाचे विद्वान आदि शंकराचार्य यांनी या मंदिराला ८ व्या शतकात भेट दिली होती, तेव्हापासून या टेकडी आणि मंदिराला आदि शंकराचार्य हे नाव पडले. त्यांच्या इथल्या वास्तव्या संबंधित एका रोचक आख्यायिकेनुसार त्यावेळी आदि शंकराचार्य यांचा शक्तीपंथावर विश्वास नव्हता. एकदा भुकेलेले असताना त्यांना एक गवळण टेकडीच्या पायथ्याशी दूध घेऊन जाताना दिसली. त्यांनी तिला हाक मारून दूध देण्यास सांगितले. तेव्हा तिने त्यांना स्वत: खाली येऊन दूध घेऊन जाण्यास सांगितले. यावर ते उद्वेगाने म्हणाले की, 'माझ्यात तेवढी शक्ती (ताकद) नाही.' तेव्हा गवळणीने त्यांना टोमणा मारला की तुमचा शक्ती (देवी स्वरूप) वर विश्वासच नाही तर तुमच्यात शक्ती (ताकद) येईल कुठून?! तिच्या या वक्तव्याचा त्यांच्या थेट वर्मावरच आघात झाला. बरेच चिंतन केल्यावर त्यांना तिच्या कथनातील सत्यता पटली. तेव्हापासून ते शक्तीचे उपासक झाले आणि शक्तीची स्तुतीकरणारे 'सौंदर्य लहरी' काव्य त्यांनी इथे रचले. तसेच या पवित्र स्थळी शिव-शक्ती यांच्या मिलनाचे प्रतिक असणाऱ्या 'श्री यंत्रा'ची सुद्धा निर्मिती झाली. मुख्य मंदिराजवळच आदि शंकराचार्यांची तप करण्याची लहानशी मठी आहे. इथे एखाद्या महत्त्वपूर्ण स्थळाचे सौंदर्य कसे नष्ट करावे ते आपल्या शासकीय कर्मचाऱ्यांकडून शिकावे असे खेदाने म्हणावेसे वाटते. हमखास अडथळा व रसभंग करतील अशा पद्धतीने रोवलेले विजेचे खांब, खेचलेल्या तारा आणि आतील भगभगीत दिवे, मनसोक्त छायाचित्रणाची एक पर्वणी आयुष्यभरासाठी वाया घालवत आहेत, असा विचार करण्यास भाग पाडतात.




या मंदिर परिसराला १९०३ साली श्री. अरबिंदो, १९५९ साली विनोबा भावे (यासाठी शीर्षकातील 'जिव्हाळा'!) या सारख्या प्रसिद्ध व्यक्तींनी भेट दिली. १९२५ साली म्हैसूरचे महाराज काश्मीरला आले असता त्यांनी मंदिराच्या भोवती पाच आणि शीर्षस्थानी एक असे इलेक्ट्रिकल सर्च लाइट बसवून, विजेचा खर्च भागवण्यासाठी देणगीही दिली. १९६१ साली द्वारकापीठच्या शंकराचार्यांनी आदि शंकराचार्यांची मूर्ती मंदिरात ठेवली. १८६९ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकातील छायाचित्राप्रमाणे संशोधकांना हे मंदिर ओसाड, पडझड झालेल्या अवस्थेत दिसले तरी आता इथे नियमित पूजा केली जाते. अमरनाथ यात्रेदरम्यान तसेच महाशिवरात्रीला (या परिसरात या दिवसाला 'हेरथ' म्हणतात) यात्रेकरू या मंदिराला आवर्जून भेट देतात. खरोखरच, परमपूज्य आदि शंकराचार्यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या या मंदिराने सर्व हिंदू धर्मियांच्या मनात जिव्हाळ्याचे स्थान प्राप्त केले आहे.

**संदर्भ –**

1) A. Cunningham (1848) - An Essay on the Arian Order of Architecture, As Exhibited in the Temples of Kashmir, Baptist Mission Press, Circular Road, Culcutta, India

2) H. H. Cole (1869) -Illustrations of Ancient Buildings in Kashmir for Archaeological Survey of India, London, England

3) Rai Sahib Daya Ram Sahni (1918) - Pre Muhammadan Monuments of Kashmir, Archaeological Survey of India, Annual Report 1915 - 16, (edited by Sir John Marshall), Calcutta, India

4) R. C. Kak (1933) -Ancient Monuments of Kashmir, The India Society, London, England

5) P. A. Koul (1935) - Archaeological Remains in Kashmir, The Mercantile Press, Lahore, India

6) https://en.m.wikipedia.org/wiki/Shankaracharya_Temple

7) https://www.greaterkashmir.com/opinion/shankaracharya-temple-history-on-a-hill/

८) भारतीय पुरातत्व विभागातर्फे उभारण्यात आलेला माहिती फलक.

⌘⌘⌘

**संपर्क :** ३०६, डॅफोडिल, नीलकंठ गार्डन, गोवंडी(पूर्व)
मुंबई ४०००८८ **भ्रमणध्वनी :** ९८६९०५१८१९

# सायबर सुरक्षितता - तुमच्या हाती!

© प्रसाद श्रीधर भावे, तळेगाव.

**मला कुलवृत्तांता संदर्भात अभय भावे यांचा फोन आला होता, माहिती सांगत असताना मी काय करतो हे त्यांना सांगितले की माझा व्यवसाय हा एथीकल हॅकरचा आहे.. हे ऐकल्यानंतर ते म्हणाले मला प्राजक्तसाठी या विषयावर लेख हवा आहे. आपल्या वाचकांना काही सायबर रिलेटेड टिप्स देऊ शकता का? त्यासाठी मी खालील लेख लिहिलेला आहे. सहज आणि सोप्या भाषेत समजण्यासाठी मराठीत लेख लिहिला आहे.**

आजच्या युगात जर आपण मागे वळून बघितले तर आपल्याला दिसते की पन्नास वर्षांपूर्वी सर्व गोष्टी या फिजिकल पद्धतीने होत्या, दळणवळणाची साधने खूप कमी होती. फोन इंटरनेटचा शोध लागला आणि हळूहळू जग हे एकमेकांच्या जवळ येऊ लागले. फोन आणि इंटरनेट यामध्ये खूप आमुलाग्र बदल झाले आणि माणसाचे आयुष्य हे जास्तीत जास्त कसे गतीमान होईल, आरामदायक होईल यावर भर दिला गेला. या दोन गोष्टींचा फायदा मानवी जीवनातील प्रत्येक वस्तूवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे झाला.

सामान्य व्यक्तीच्या आवाक्याबाहेर असलेले कॉम्प्युटर, मोबाईल हे घरोघरी पोहोचले आणि भारत आणि अख्ख्या जगाने जोरदार क्रांती केली. ही क्रांती माहिती तंत्रज्ञान म्हणजे आपण आय.टी. म्हणतो यामुळे शक्य झाली यामध्ये इन्फर्मेशनला खूप महत्त्व आहे आणि त्याचा तुम्ही वापर कसा करता हे पण महत्त्वाचं आहे. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीमध्ये भरपूर प्रकार आहेत आणि आपण जे आज वापरतो ते या सर्व टेक्नॉलॉजींचे एकत्रीकरण.

या सर्व आय.टी. टेक्नॉलॉजी उत्तम चालल्यामुळे आपण काही गोष्टी शक्य करू शकतो म्हणजे आज बँकेत न जाता आपल्या खात्यातील पैसे आपण दुसऱ्याला पाठवू शकतो. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट यासारख्या साईटवरून आपण काही ऑनलाईन खरेदी करू शकतो.

या सर्व गोष्टी करत असताना जे सर्विसेस प्रोव्हाइड करतात त्यांना त्यांचा डेटा सिक्युअर करणे ही खूप महत्त्वाची गोष्ट असते. हा जनरेट झालेला डेटा स्टोअर करून ठेवणे ही त्या कंपनीची जबाबदारी असते.

कंपन्यांना काही ॲश्युरन्स लागतो की डेव्हलपरने केलेले सॉफ्टवेअर खरंच बरोबर चालते आहे का नाही, ते हॅक होऊ शकते का नाही. यासाठी भरपूर उपाय असतात त्यातील एक म्हणजे पेनिट्रेशन टेस्टिंग त्यासाठी कंपनी एथिकल हॅकरना अपॉइंट करते.

एथिकल हॅकर म्हणजे काय हे इथे लक्षात घ्यावं लागतं.

एथिकल हॅकर हा योग्य मार्गाने, परवानगी घेऊन, संस्थांच्या सिस्टिम्स तपासतो, त्यामधील त्रुटी शोधतो आणि त्या दूर करण्याचा सल्ला देतो. म्हणजेच, वाईट हेतूने नव्हे तर चांगल्या हेतूने हॅकिंग करणारा तज्ज्ञ म्हणजे एथिकल हॅकर.

हे सर्व उपाय कंपनी त्यांचे ॲप्लीकेशन करण्यासाठी नक्कीच करत असते आणि गेल्या दहा ते पंधरा वर्षांमध्ये या क्षेत्रामध्ये खूप चांगले बदल होऊन नवीन तयार होणाऱ्या ॲप्लीकेशनसमध्ये सिक्युरिटी पर्याय (ऑप्शन) उपलब्ध असतात. पण भरपूर वेळेला ॲप्लीकेशन वापर करायला सोपे व असावे यासाठी ते सिक्युरिटी ऑप्शन डिसेबल असतात.

आपण सायबर क्रिमिनलपासून सुरक्षित राहण्यासाठी असे सिक्युरिटी ऑप्शन अनेबल करणे खूप गरजेचे आहे. त्याच प्रमाणे आजच्या युगात सायबर गुन्हेगार मुख्य तीन पद्धतीने त्यांच्या जाळ्यात लोकांना अडकवण्याचा प्रयत्न करतात.

### सायबर सुरक्षेचा मूलमंत्र
### फसवणुकीपासून कसे वाचावे?

आजच्या डिजिटल युगात सायबर गुन्हेगार सामान्य लोकांना फसवण्यासाठी मुख्यत: तीन प्रकारच्या मूलभूत पद्धती वापरतात.

१) विश्वास (Trust)

२) भीती (Fear)

३) मदतीचा बहाणा (Ability to Help)

याशिवाय, या भावना आणखी तीव्र करण्यासाठी ते Urgency (तातडीची गरज), Greed (लोभ/जास्तीची अपेक्षा) आणि Curiosity (कौतुक/गुंतवणूक करण्याची इच्छा) या मनोवैज्ञानिक तत्त्वांचाही कौशल्याने वापर करतात.

चला, प्रत्येक प्रकार सविस्तर समजून घेऊ.

१) विश्वास निर्माण करणे (Trust Development)

सर्वात आधी गुन्हेगार तुमच्याशी विश्वासाचा पूल तयार करतात.

उदाहरणार्थ - एका प्रसिद्ध मराठी अभिनेत्याला अनोळखी नंबरवरून व्हॉटस ॲप मेसेज आला.

**आम्ही तुम्हाला काही व्हिडिओ पाठवू. तुम्ही ते लाईक आणि शेअर करा. दररोज ५०० रुपये कमवा! कोणताही करार नाही, कोणतीही गुंतवणूक नाही, घरबसल्या कमाई.**

- Urgency factor वापरला - लवकर सुरुवात करा, संधी मर्यादित आहे!
- Greed factor वापरला - बसल्या बसल्या पैसे मिळतील.
- Trust buildup - सुरुवातीला खरोखर थोडेसे पैसे मिळवून देणे.

या अभिनेत्याने सुरुवातीला काही दिवस यावर विश्वास ठेवून काम केलं. खात्यावर पैसेही आले. नंतर जास्त पैसे मिळवण्यासाठी थोडी गुंतवणूक मागितली गेली, आणि नंतर मोठ्या रकमेची फसवणूक झाली.

**धडा -** कोणतीही रक्कम कमवा, दुप्पट परतावा वगैरे योजना सावधगिरीने तपासा. कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर किंवा लिंकवर विश्वास ठेवू नका.

२) भीती दाखवणे (Fear Creation)

भीती दाखवून घाईने निर्णय घ्यायला लावणं ही फार जुनी पण आजही प्रभावी पद्धत आहे.

उदाहरणार्थ - **एखाद्या व्यक्तीला फोन येतो, तुमचा मुलगा/नातेवाईक पोलीस स्टेशनमध्ये आहे. त्याने गंभीर गुन्हा केला आहे. केस मिटवायची असेल तर लगेच पैसे भरा!**

- Urgency factor वापरला - लगेच पैसे द्या, नाहीतर केस दाखल होईल!
- Fear factor वापरला - नातेवाईक अडचणीत आहे म्हणून भीती.

घाबरलेली व्यक्ती लगेच पैसे ट्रान्सफर करते. नंतर लक्षात येतं, हा सगळा बनाव होता.

**धडा -** कोणत्याही फोन कॉलवर लगेच घाबरून प्रतिक्रिया देऊ नका. खात्री करण्यासाठी स्वत: पोलीस ठाण्यात संपर्क करा किंवा नातेवाईकांशी थेट संपर्क साधा.

३) मदत करण्याचा बहाणा (Pretending to Help)

ते स्वत:ला मदत करणारा, सहृदय व्यक्ती म्हणून दाखवतात.

उदाहरणार्थ - **तुमचं बँक खातं ब्लॉक होणार आहे, मी बँकेचा अधिकारी आहे. तुमचं अकाउंट वाचवण्यासाठी ओटीपी द्या.**

(पान क्र ८ वर)

# Unsung Heros
# गाऊ त्यांना आरती!

© सौ. सुवर्णा भावे – जोशी, चिपळूण.

**रोहा घराण्यातील जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिप मिळवणारे वसंत गजानन भावे.**

माझे वडील वसंत गजानन भावे म्हणजेच आमचे नाना, यांचा जन्म १२ मार्च १९२९ चा. माझं माहेर रायगड जिल्ह्यातील रोहा. रोह्यातल्या मीठवाले भावे या नावानी प्रसिद्ध असलेल्या माझ्या पणजोबांचा वसंता हा एक अत्यंत हुशार नातू. अत्यंत कुशाग्र बुद्धीमत्ता, विवेकनिष्ठ विचारपद्धती आणि डोळसपणा हे गुण लहानपणापासुनच होते. त्यांचे वडील (माझे आजोबा) बाबुराव भावे हे स्वातंत्र्यसैनिक. नाना शाळेत असताना आजोबा सगळा वेळ देशकार्याकरिताच देत. आपली मुलं काय शिकताहेत याचा त्यांना पत्ताच नसे. नाना सतत उत्तम गुण मिळवून पहिला क्रमांकही मिळवत.



नाना मॅट्रीकला असताना प्लेगची साथ आली. परिक्षेसाठी त्यांना श्रीवर्धनला जावं लागलं. अभ्यास पूर्ण झालेला असल्यामुळे तिकडे जाताना त्यांनी एकही पुस्तक बरोबर नेलं नाही. **निकाल लागल्यावर समजलं की त्यांना प्रतिष्ठेची जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळालीय कारण संस्कृतमध्ये ९८/१०० गुण होते. अंदाजे पन्नास वर्षापूर्वीची गोष्ट आहे ही, त्यावेळी साठ गुण मिळणं अवघड होतं.**

पुढे ते एम.ए. पर्यंत शिकले. त्यांना मराठी, हिंदी, संस्कृत, पाली आणि अर्धमागधी भाषा येत होत्या. ते शाळेत शिक्षक झाले, इंग्रजी आणि संस्कृत शिकवत. मग ते रोह्याच्या कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मेहेंदळे हायस्कुलमध्ये ते नोकरी करत होते. चेअरमन आणि शाळेचे मुख्याध्यापक ही दोन्ही पदं एकाच वेळी सांभाळत होते. अत्यंत शिस्तप्रिय आणि तरीही समजून घेणारे अशी त्यांची प्रतिमा होती.

इंग्रजी विषय शिकवण्याची त्यांची एक खास पद्धत होती. ते वर्गात आले की शिकवलेल्या सगळ्या इंग्रजीच्या कविता आधी मुलांना म्हणायला सांगत, जसजशा कविता शिकवून होतील, तसतशी एकेक कविता म्हणायची संख्या वाढत जाई. त्यामुळे सगळ्याच मुलांना सगळ्या कविता पाठ होत असत. गृहपाठ दिला तर नेमका ज्याने गृहपाठ केला नसेल त्यालाच बरोब्बर विचारत असत त्याबद्दल!! मुलांना नवल वाटे की सरांना कसं कळलं? वर्गातल्या मागच्या बाकावर बसणाऱ्या मुलांना समजलं पाहिजे इतकं सोप्पं करून ते शिकवत. त्यांच्याकडे इंग्रजी शिकलेले विद्यार्थी आजही त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात, की सरांमुळे आमचं इंग्रजी इतकं छान झालं.

नाना घरी दोन बॅचमधे शिकवण्या घेत असत. एक हुशार मुलांची फी देऊन येणारी बॅच आणि एक त्यांच्या भाषेत बॅक बेंचर्स, ते उत्तीर्ण व्हावे म्हणून ही शिकवणी फुकट असे. इंग्रजी हा विषय खूप जणांना जड जात असे. इंग्रजी आणि गणित हे दोन अहीमही राक्षस असत मॅट्रीकच्या प्रवासात. किमान ३५ गुण मिळवून पास होण्याचं तंत्र नानांनी शोधलं होतं, ज्यांना इंग्रजीमुळे आपण मॅट्रीकमधे गचकणार असं वाटत असे, त्यांना ही शिकवणी मिळे, पास होण्याची!! शिकवणीला येणाऱ्या मुलामुलींना नानांनी कधीच धाक दाखवला नाही, खेळीमेळीच्या वातावरणात शिकवणी चाले.

काही मुलं खास शिकवणी लावत इंग्रजीसाठी स्पेशल एकट्यासाठी!! भावे सरांनी इंग्रजी शिकवलं की हुशार मुलांना भरपूर गुण मिळणार आणि ढ मुलांची नैय्या पार होणारच, याची अवघ्या रोह्याला खात्री असे !!!

नाना मुख्याध्यापक असताना शाळेच्या मुलांचा गोविंदा आमच्या अंगणात येत असे. छान गोविंदा खेळत असताना आई त्यांना दहीपोहे खायला द्यायची, अंगणात चुलीवर पाणी तापत ठेवायची, गार पाण्याने आजारी पडाल रे, असं म्हणायची. कोणीतरी हे कोमट पाणी त्यांच्या अंगावर ओतायचं, भिजून येऊन थंडीनं काकडत असलेली मुलं खुष व्हायची.

भावे घराणं हे भिक्षुकी करणारं, तर माझ्या पणजोबांनी व्यापार सुरू केला होता. आजोबा स्वातंत्र्यसैनिक!! या सगळ्या वातावरणात लहानाचे मोठे होऊन आणि रोह्यासारख्या खेडेगावात राहून नानांनी स्वतंत्र विचारसरणी अंगीकारली. खोताचा नातू असून ते समाजवादी विचारांचे होते. विशेष म्हणजे ते पूर्णपणे नास्तिक होते. घरात यथासांग पूजाअर्चा, कुळाचार चालू असताना हे मात्र नास्तिक झाले. या नास्तिकतेमागे खूप विचार होते. ते नास्तिक होते पण त्यांनी त्यांचे विचार कधीच इतरांवर लादले नाहीत किंवा जे आस्तिक आहेत त्यांची चेष्टामस्करी केली नाही. आजी आजोबा आम्हाला रोज शुभंकरोती म्हणायला बसवत, तेव्हा नाना म्हणायचे एखादी गोष्ट नियमितपणे करणे, पाठांतर करणे हे छानच आहे. नानांच्या सहवासात राहून आणि त्यांचे विचार ऐकून आई पण नास्तिक झाली होती. त्यांच्या या नास्तिकतेमध्ये प्रचंड शक्ती होती. त्याचं प्रत्यंतर योग्य वेळी सर्वांना आलंच.

नानांना नवनवीन गोष्टी जाणून घेणं, वाचन या गोष्टी अतिशय प्रिय होत्या. त्यांचे विचार काळाच्या पुढे होते. आईला त्यांनी नेहमीच बरोबरीची वागणूक दिली. तिला इंग्रजीचं आवश्यक तेवढं ज्ञान व्हावं, समाजातल्या परिस्थिती बाबत माहिती व्हावी म्हणून ते तिच्याशी विविध विषयांवर चर्चा करत. स्वयंपाक करताना गृहिणी अतिशय मनापासून काम करत असते, तेव्हा एखादा पदार्थ बिघडला तरी लगेच नावं ठेवू नये, मात्र चांगल्या पदार्थाचं आवर्जून कौतुक करावं असं ते नेहमी सांगत. मुलींनी नटण्यामुरडण्यात वेळ घालवू नये, साधं रहावं, सोयीचा पोशाख करावा, असं त्यांना वाटत असे. आईलासुद्धा ते म्हणत की तुला सुटसुटीत वाटत असेल तर अवश्य तू घरात गाऊन घाल, पण आईला तो कधी सोयिस्कर वाटला नाही. केसांचा मी बॉबकट करावा असं त्यांनीच मला सुचवलं होतं. जास्तीत जास्त वेळ काहीतरी शिकण्यासाठी वापरावा असं ते सांगत. कोणी आपल्याला एखादं काम सांगितलं आणि ते करणं आपल्याला शक्य नसलं तरी लगेच जमणार नाही, असं म्हणू नये. आधी हो म्हणावं आणि मग आपल्याला हे काम करण्याची इच्छा आहे पण अशी अडचण आहे हे सांगावं, असं ते सांगत.

स्वत: शिक्षक असुनही अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टी जसं खेळ, वाचन, वक्तृत्व, कला याकडे मुलांनी अवश्य लक्ष दिलं पाहिजे, कदाचित त्यात सुद्धा करियर होऊ शकते, असं ते म्हणत. भेटायला आलेल्या पालकांना ही गोष्ट ते आवर्जून सांगत.

साधारणपणे १९७५ ला त्यांची प्रकृती बिघडायला सुरुवात झाली. चालताना मध्येच पाऊल अडखळत असे आणि हळूहळू पायातली ताकद कमी होत गेली. पुण्याला रुबी हॉल इथे सर्व चाचण्या करून घेतल्यानंतर मोटर न्यूरॉन डिसीज हा मज्जासंस्थेवर हळूहळू आघात करणारा अतिशय दुर्मिळ आजार झाला आहे, हे समजलं. नाना रिक्षात बसून शाळेत जात, उतरल्यावर चालता येत नसे, सुरुवातीला कोणी धरल्यास चालता येई, नंतर घसपटत जावं लागे, रोह्यात एकच रिक्षा होती, तो रोज वेळ पाळत असे, पण कधीतरी गाव हिंडून आई त्याला शोधून आणे, आम्ही भावंडं शाळेत होतो व शाळेत उशीरा गेलेलं नानांना चालत नसे. संसाराची जबाबदारी असल्याने ते नोकरी सोडू शकत नव्हते. शाळेनंही सहकार्य केलं होतं, त्यांच्या विषयाचे वर्ग तळमजल्यावर ठेवून, त्यांना उठता येत नाही, हे

माहिती असूनही मुलं शांतपणे तासभर वर्गात बसून शिकत. अर्थात ते फारच उत्तम शिक्षक होते. हळूहळू दुखणं वाढत होतं. मग हातावरचा ताबा गेला आणि अर्धपगारी रजा घेतली. आता ते हलू शकत नव्हते, पण बोलता येत असे. दिवसभर झोपून किंवा बसवल्यास थोडा वेळ तक्क्याला टेकून आई त्यांना बसवायची. त्यांची दाढी, युरिन पॉट आणि बेडपॅन ही कामं आईच करायची, फक्त केस कापायला न्हावी घरी यायचा. आम्ही तिघं शालेय शिक्षण घेत होतो. घरात असलेल्या भाडेकरूंचं भाडं, आईचं शिवणकाम आणि मी साडीला फॉल लावायची (बिडींग मशीन नव्हतं) श्रीकांतकाका आणि जयंतादादा करत असलेली मदत यात भागवायचं. माझी थोरली आत्या शांता आत्याकडे जाऊन पुण्याला तपासणी केली होती. ती व इतर आत्या यांची सुद्धा बरीच मदत होत असे. या लोकांचा मानसिक आधार खूप होता.

वडील शिक्षक असल्याने तिघांना शाळेत फी भरावी लागत नसे. पुस्तकं आत्तेभावंडांची मिळाली. बाकी आम्ही कोणताही हट्ट करीत नसू. शाळेची सहल जाणार असेल तर आईला सांगतच नव्हतो, कारण पैसे नव्हते. आईला आम्ही मदत करायचो, पण लहान होतो. मेडिकल एनसायक्लोपिडियातून नानांनी त्यांच्या दुखण्याची माहिती घेतली आणि आईला सांगितलं की ॲलोपथीचे उपचार आणि हॉस्पिटलमध्ये ठेवणे यानी मी बरा होणार नाही, मात्र सर्व पैसा खर्च होऊन तू मुलाबाळांसह रस्त्यावर येशील माझ्या पश्चात. तेव्हा मंगलोर येथून त्यांनी होमिओपॅथीची औषध मागवली शेवटपर्यंतचं दुखणं सुसह्य होण्यासाठी.

नंतर त्यांची वाचाही गेली, बसता येईना. व्हीलचेअर घेणं शक्य नव्हतं कारण घरात प्रत्येक खोलीच्या दारात उंबरठा. दिवसभर घरात एका जागी ते कंटाळवाणे होतील म्हणून आई त्यांना उचलून अंगणात बाजेवर आणून झोपवायची. नानांचे स्नेही व्ही.एस. सर येत त्यांच्याजवळ बसायला कधीकधी. मग ते आईला सांगत की, 'म्हातारा आला आहे गो, तुला कुठे बाजारात वगैरे जायचं असेल तर जाऊन ये हो, मी आहे वसंतरावांजवळ!!'

आम्ही त्यांना वाचून दाखवत असू. बोलता येत नाही पण बसता येत होतं तेव्हाच आम्ही मूळाक्षरं एका पाटीवर चिकटवली होती व त्याखाली घरातील सगळ्या जणांची नावं, रोज लागणारे शब्द, जेवण, चहा, पेपर, शेजारी, आला, गेला, का, कोण इ. लिहीले होते. एकेका शब्दावर बोट ठेवून ते आपलं म्हणणं जवळजवळ शेवटपर्यंत सांगत असत. अशा पद्धतीने ते दोन पानी पत्रसुद्धा आम्हाला डिक्टेट करत असत. खूप लोकांशी पत्रव्यवहार होता त्यांचा.

चांगले असताना ओरिएंट लाँगमनस सारख्या प्रकाशनाने त्यांचं मराठी व्याकरणावरचं पुस्तक प्रसिद्ध केलं होतं, शिवाय बालकथांची पाच ते सहा पुस्तकं प्रसिद्ध झालेली होती. त्यांना भेटायला कोणी ना कोणी येई त्यालाही ते आमच्या मार्फत या पाटीच्या सहाय्याने प्रश्नोत्तरे करीत असत. आम्ही शाळेत रोज गेलंच पाहिजे आणि अभ्यास चुकवायचा नाही कारण गुणांवरच पुढचं शिक्षण अवलंबून आहे म्हणून आई आम्हाला अभ्यासाला वेळ द्यायची. त्यातच पुढच्या शिक्षणासाठी रोह्याला सोय नसल्याने माझा भाऊ केदार याला पुण्याला ठेवलं. नंतर मी पण पुण्याला शिकायला गेले. मी विद्यार्थी सहाय्यक समितीच्या वसतिगृहात रहात होते. दोघांनाही वेळोवेळी आवश्यक ती मदत श्रीकांतकाका, सरिताकाकू, शांतात्या यांनी केली. बाकीच्या आत्या पण मदत करायच्या.

नानांचा आजार दिवसेंदिवस बळावतच गेला. माझी छोटी बहीण संजु खूपच लहान होती आठवी-नववीत, माझी शेवटची सेमिस्टर होऊन मी रोह्याला आले आणि माझा रिझल्ट लागण्यापूर्वी ३० एप्रिल १९८२ ला नाना गेले. भाऊ केदार त्यावेळी एम.ए. करण्यासाठी जे.एन.यु.दिल्ली इथं होता.

आजार हातपाय पसरत असूनही अखेरपर्यंत डोळे आणि मेंदु मात्र व्यवस्थित काम करत होते. वडील बिनपगारी रजेवर, तीनही मुलं शाळेत शिकणारी, अशा परिस्थितीत आमच्या आईने दिलेला लढा अविस्मरणीय असाच आहे.

नाना नास्तिक होते. पाच वर्ष या असाध्य आजाराने ग्रासलेले असताना, संसारावर अनेक संकटं येत असतानाही अखेरपर्यंत 'देवा, मला सोडव.' हे शब्द त्यांनी कधीही उच्चारले नाहीत. माझ्या मृत्यूनंतर कोणतेही धार्मिक विधी करू नये असं त्यांनी सांगून ठेवलं होतं. त्याचा मान राखून आमच्या घरातील वडिलधाऱ्यांनी म्हणजे आई, माझ्या आत्या, काकाकाकू, यांनी त्यांचे विधी करण्याऐवजी शाळेत काही रक्कम मुलांना बक्षिसे देण्याची योजना केली.

आपला आजार काय आहे, तो बरा होणारा नाही, यातच आपण एक दिवस जाणार हे माहिती असूनही नाना आईला सर्व मार्गदर्शन करत. आम्हाला कोणतीही झळ लागू न देता आई, नाना दोघांनी शांतपणे व आम्हाला सर्व सांगून, विश्वासात घेऊन धीरानं प्रसंगाला तोंड दिले. आज आम्ही तीनही भावंड प्रेमाच्या घट्ट बंधनांनी बांधलेले आहोत त्याला कदाचित हे अवघड प्रसंगही कारणीभूत असतील.

आज नाना असते तर त्यांना हे मोबाईल फोन, व्हॉटस अप, फेसबुक नक्कीच खूप आवडलं असतं, कारण त्यांना नवनवीन गोष्टींची आवड होती. वाचन हा त्यांचा आत्मा होता. आज या नवीन माध्यमातून त्यांचे काळाच्या पुढे असलेले विचार त्यांनी नक्कीच जगासमोर मांडले असते.

**संपर्क :** फ्लॅट नं २१ बी, अश्विनी अपार्टमेंट, बेंदकर आळी, चिपळूण ४१५६०५ **भ्रमणध्वनी :** ९४२१८९५८५४

⌘⌘⌘

(पान ६ वरून)

- Urgency factor वापरला - लगेच ओटीपी द्या नाहीतर खातं बंद होईल!

- Curiosity factor वापरला - तुमच्या खात्यावर संशयास्पद हालचाल झाली आहे! लोकं घाईत ओटीपी देतात आणि मग त्यांचं खातं रिकामं केलं जातं.

**धडा -** कोणत्याही मदतीच्या नावाखाली बँक तपशील, ओटीपी, पासवर्ड देऊ नका. बँका किंवा सरकारी संस्था कधीही फोनवर माहिती विचारत नाहीत.

**दैनंदिन जीवनात सायबर सुरक्षिततेसाठी काही सोप्या टिप्स**

१. बँक व्यवहार करताना - आपला OTP (वन टाईम पासवर्ड), पासवर्ड, कार्ड नंबर, CVV नंबर कोणालाही सांगू नका. जर कुणाचा फोन आला आणि त्यांनी बँकेच्या वतीने बोलतो सांगितलं, तरीही माहिती देऊ नका. बँक कधीही फोनवर गोपनीय माहिती मागत नाही.

२. मोबाईल व ॲप सुरक्षितता - मोबाईलमध्ये बँकिंग ॲप वापरत असाल, तर मोबाईलला पिन/फिंगरप्रिंट लॉक ठेवा.

WhatsApp, Facebook, Gmail यांसारख्या ॲप्ससाठी Two-Factor Authentication (2FA) चालू करा. (यामुळे पासवर्ड माहीत असला तरी दुसऱ्याला सहज प्रवेश मिळणार नाही.)

३. सोशल मीडिया वापरताना अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. अनोळखी व्यक्तींच्या फेसबुक फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका. आपल्या प्रोफाईलची माहिती 'Public' ठेवू नका. फक्त मित्रांसोबत शेअर करा.

४. फोनवर येणाऱ्या ऑडिओ मेसेजबाबत - हल्ली सरकारच्या वतीने एक रेकॉर्डेड कॉल येतो, ज्यामध्ये सांगितलं जातं - OTP कुणालाही सांगू नका, घाईत निर्णय घेऊ नका. **हा संदेश खूप महत्त्वाचा आहे. नेहमी लक्षात ठेवा - फसवणूक करणारे घाई करायला लावतात. शांतपणे विचार करा आणि कोणतीही गोपनीय माहिती शेअर करू नका.**

**निष्कर्ष**

आजचं जीवन इंटरनेटशिवाय अशक्य झालं आहे. पण जसे आपण घराला कुलूप लावतो, तसंच ऑनलाइन जगातही सुरक्षिततेचे कुलूप लावणं आवश्यक आहे. थोडीशी सावधगिरी आणि योग्य खबरदारी घेतली, तर आपण स्वत:ला आणि आपल्या कुटुंबाला सायबर गुन्हेगारीपासून सुरक्षित ठेवू शकतो.

**संपर्क :** राजगुरु हौसिंग सोसायटी, तळेगाव रेल्वे स्टेशन जवळ, तळेगाव दाभाडे जि. पुणे ४०१५०६ **भ्रमणध्वनी :** ८३०८८८९७७५

⌘⌘⌘

## नेत्रदान

© डॉ. अरुंधती सुधीर भावे, नागपूर.

नेत्रदान सर्वश्रेष्ठ समजलं जातं कारण हे दान मरणोपरांत असतं. माणूस हे जग सोडून जाताना त्याचा कुठलाही स्वार्थ दानात नसतो. एका नेत्रदानाने दोन अंध व्यक्तींना लाभ होऊ शकतो.

नेत्रदानाची तीव्रता, आवश्यकता का जाणवते? कारण भारतात General blindness ही मोठी समस्या आहे. ह्यावर उपाय म्हणजे नेत्र रोपण. नेत्र रोपणाकरिता उत्तम नेत्राची गरज असते. नेत्रदानाद्वारे उत्तम डोळे मिळतात म्हणून नेत्रदानावर जनजागरण आवश्यक आहे. उत्तम नेत्र मिळाले तर नेत्ररोपण शस्त्रक्रिया १००% यशस्वी होते.

भारतात 1 Million लोक corneally blind आहेत. दरवर्षी सुमारे ३० हजार रुग्णांची त्यात भर पडते. नेत्रदानाद्वारे तसंच नेत्ररोपणाद्वारे अंधत्व सहज निवारण होऊ शकतं. दरवर्षी साधारणत: ४५००-५००० नेत्ररोपण शस्त्रक्रिया होतात. भारतात फक्त २० ते ३० हजार नेत्रदान होतं. ह्यात नेत्राची व रक्ताची चिकित्सा करून फक्त ४ ते ५ हजार डोळे रोपणालायक असतात म्हणूनच नेत्रदानासाठी जनजागरणाची नितांत गरज आहे.

नेत्रपेढीचा नेत्रदानात खूप मोठा सहभाग आहे. National Program for control of corneal blindness वर नेत्रदानाची संख्या वाढविण्यास मदत होते. उत्तम नेत्र हॉस्पिटलमध्ये मृत्यु झालेल्या लोकांकडून मिळतात. मृत्युनंतर नेत्रात ६ तासांपर्यंत संजीवनी असते. ह्या दरम्यान नेत्रदान केले जाते. तसंच रक्त तपासणी केल्यानंतर व नेत्राची सखोल तपासणी केल्यानंतरच नेत्र वितरण होते. हेतु हा की नेत्रदात्याला जर काही आजार असल्यास रोपणाद्वारे त्या व्यक्तीला तो आजार व्हायला नको.

नेत्रदान कुणीही करू शकतात. वय, जात, लिंग हे भेद तिथे नसतात.

नेत्र वितरण करताना जी व्यक्ती दोन्हीही डोळ्यांनी अंध आहे तिला प्राधान्य दिले जाते.

नेत्र फूल म्हणजे डोळ्याचा काळा भाग असतो त्यावर पांढरा पडदा आल्यास बाहेरची प्रकाश किरणे डोळ्यांच्या आतल्या पडद्यावर उमटत नाहीत. नेत्र रोपणामध्ये तेवढाच भाग काढून मृत व्यक्तीचा डोळ्याचा भाग रोपण करतात. त्यामुळे आतल्या पडद्यावर पुन्हा प्रकाश किरणं पोचतात आणि त्या व्यक्तीला दृष्टीलाभ होतो.

मृत्युनंतर नेत्रदान करायचं असेल तर नेत्रपेढीत संमतीपत्र द्यावे लागते. संमतीपत्र दिल्यानंतर आपल्या निकटच्या नातेवाईकांना वारंवार नेत्रदानाची आठवण करून द्यावी लागते म्हणजे आपल्या मृत्युनंतर आपले नातेवाईक त्या नेत्रपेढीला कळवू शकतात. नेत्रदान केवळ १५ मिनिटात होते आणि मुख्य म्हणजे हे काम विनामूल्य होतं. नेत्रदानानंतर चेहरा विद्रुप होत नाही. नेत्रदानानंतरच पार्थिव नातेवाईकांना सुपूर्द करतात. जरी आपण संमतीपत्र लिहिले नसेल तरी नेत्रदान होतं.

श्रीलंकेमध्ये प्रत्येक व्यक्तीचे नेत्रदान हे कायद्यानुसार होतं. इतका छोटा देश अनेक देशांना नेत्र पुरवतो.

भा.रा.तांबे यांची कविता मला आठवते.

**जन पळभर म्हणतील हाय हाय**
**मी जाता राहील कार्य काय।।**

नेत्रदानाद्वारे तुम्ही अमर व्हाल.

**संपर्क :** १८३, शास्त्री लेआऊट, सोमलवार हायस्कूलसमोर, खामला, नागपूर ४४००२५ **भ्रमणध्वनी** - ९८२३०११८७७



**डॉ. भूषण विठ्ठल भावे, गोवा** यांच्या विचार वाटिका या लेख संग्रहाचे दि. २३ मार्च २०२५ ला पुण्यात मिलेनियम हायस्कूलमध्ये आयोजित एका विशेष कार्यक्रमात प्रकाशन झाले. संस्कृती परिवेश, सण व उत्सव, इतिहास व समाजशास्त्र, शिक्षण, उद्योग व व्यवसाय व व्यक्ती विशेष अशा सहा विषयांतर्गत ३१ लेखांचे हे पुस्तक आहे. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक केदार वाळिंबे, बा.भ. बोरकरांची नात लीना भट, अन्वित फाटक, गायक डॉ.पूर्णानंद चारी उपस्थित होते. अन्वित फाटक यांनी पुस्तका विषयी बोलताना अनेक सामाजिक व ऐतिहासिक विषयांवर त्यांनी उजेड टाकला आहे असे प्रतिपादन केले.

**भावे मित्र मंडळातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!**




शिक्षकी पेशामध्ये ३५ वर्ष योगदान दिलेल्या **श्री. रवी श्रीपाद भावे, गोवा** यांचा सन्मान दि ०९-०४-२०२५ ला करण्यात आला. हा सन्मान श्री. माधवराव ढवळीकर चॅरिटेबल ट्रस्ट व कवळे पंचायतीतर्फे करण्यात आला. लोकसेवेसाठी आपले जीवन वाहिलेल्या विविध व्यक्तींचे सन्मान त्या दिवशी केले गेले. रवी भावे यांनी सेंट मेरीज हायस्कूल, फोंडा येथे काम करीत असताना सलग ३५ वर्षे हिंदी विषयामध्ये १००% निकाल देण्याचा विक्रम केला होता. त्यांनी गोवा बोर्डासाठी गोपनीय काम कित्येक वर्ष पाहिलं. एस. सी. आर. टी.साठी हिंदी विषयाचे रिसोर्स पर्सन म्हणून देखील काम पाहिलं होतं. वेगवेगळ्या सामाजिक संस्थांशी ते संलग्न आहेत.

**भावे मित्र मंडळातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!**

## साभार कृतज्ञता

**भावे शिक्षण निधीस १) साधना भावे - गोसावी, पुणे यांनी पंचवीस हजार रुपयांची तसेच २) अशोक विश्वनाथ भावे, मुंबई यांनी त्यांचा पुतण्या कै. सचिन सुषमा श्रीकृष्ण भावे यांचे स्मरणार्थ पंधरा हजार रुपयांची तसेच ३) सदानंद रामचंद्र भावे, पुणे यांनी पाच हजार रुपयांची देणगी दिली आहे.**

**भावे मित्र मंडळाच्या स्वनिधीला १) प्रकाश त्रिंबक भावे, मुंबई यांनी दोन हजार रुपयांची व सदानंद रामचंद्र भावे, पुणे यांनी एक हजार रुपयांची देणगी दिली आहे.**

**भावे मित्र मंडळ त्यांचे अतिशय आभारी आहे.**

## जमिनीवरील सर्वात मोठा सस्तन प्राणी हत्ती

© मैत्रेयी विश्वास भावे, डेहराडून.

मानव फार जुन्या काळापासून हत्तींचा अभ्यास आणि त्यांच्याशी व्यवहार करत आला आहे आणि त्यांचे सविस्तर समकालीन वृत्तांत ५-६ व्या शतकात लिहिलेल्या पालकाप्याच्या 'गजशास्त्रात' सापडतात. जमिनीवरील सर्वात मोठा सस्तन प्राणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या हत्तींना त्यांच्या शरीराच्या आकारमानानुसार राहण्यासाठी आणि वावरण्यासाठी मोठी जागा आवश्यक असते. आदर्श निवासस्थान, मुबलक अन्न आणि पाणी हत्तींच्या मूलभूत गरजा आहेत ज्या पूर्ण करण्यासाठी हत्ती आपल्या आयुष्यातील बहुतेक वेळ प्रवासात घालवतात.



या प्रवासाला अल्पकालीन हंगामी स्थलांतर म्हणतात. ही स्थलांतरे करताना हत्तींना विविध भौगोलिक प्रदेश आणि वेगवेगळे अधिवास ओलांडावे लागतात आणि लांब अंतरे पार करावी लागतात.

पिढ्यान्पिढ्या पार केलेले प्राचीन स्थलांतरमार्ग लक्षात ठेवण्यासाठी हत्ती त्यांच्या स्मरणशक्तीवर अवलंबून असतात. तरुण हत्ती हे मार्ग त्यांच्या कळपातील वृद्ध सदस्यांकडून शिकतात, ज्यामुळे संपूर्ण गटाचे अस्तित्व सुनिश्चित होते. कोणत्याही अनैसर्गिक कारणांमुळे त्यांना त्यांचे मार्ग बदलण्याची आवश्यकता नसल्यास हे स्थलांतर सुरळीतपणे होते.

हे स्थलांतर कधी शक्य आहे? जेव्हा एका जंगलानजीकच्या दुसऱ्या जंगलाशी जोडणारे नैसर्गिक अधिवासाचे मोठे पट्टे सापडतात. या जंगलांना जोडणाऱ्या अधिवासाच्या पट्ट्याला आपण सर्वसामान्य भाषेत 'कॉरिडॉर' असे म्हणतो. मूलत: वन्यजीव कॉरिडॉर दोन भूप्रदेशांना जोडणारा एक दुवा आहेत जे खंडित भूप्रदेश जोडून वन्यजीवांच्या हालचाली, प्राण्यांचे स्थलांतर, वन्यजीव लोकसंख्येचे प्रसारण आणि जनुक प्रवाह सुलभ करतात.



अशा कॉरिडॉरच्या नाशामुळे वन्यजीव लोकसंख्येचे विलगीकरण होऊ शकते ज्यामुळे त्यांची प्रजनन आणि जगण्याची क्षमता कमी होऊ शकते.

असे कॉरिडॉर ओळखण्यासाठी, संशोधकांना हत्तींच्या वर्तनाचा आणि हालचालींच्या पद्धतींचा अभ्यास करणे आणि दीर्घकाळासाठी त्यांचे निरीक्षण करणे आवश्यक असते जे रेडिओ टेलीमेट्री, ड्रोन मॉनिटरिंग, कॅमेरा ट्रॅपिंग आणि निरीक्षण यांसारख्या विविध तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे केले जाते. या कॉरिडॉरमध्ये कोणत्याही मानववंशीय क्रियाकलापांचा विकास किंवा अतिक्रमण टाळले जाते. सक्रिय कॉरिडॉर कोणत्याही कारणांमुळे विचलित झाल्यास, त्या कॉरिडॉरमधून जाणाऱ्या हत्तींच्या बचावात्मक प्रतिक्रिया, मानव-हत्ती संघर्षास कारणीभूत ठरतात. या संघर्षात जीवित व वित्तहानी होते. वन्यप्राणी कितीही आकर्षक असले तरी जेव्हा ते कोणत्याही प्रकारे अर्थव्यवस्थेवर परिणाम करू लागतात तेव्हा ते मानवांना नकोसे होतात. यामुळे प्राण्यांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण होतो म्हणूनच अशा प्राण्यांच्या संवर्धनावर जास्त भर दिला जातो.

देशाच्या हत्ती संवर्धन धोरणांचे मूल्यांकन करण्यासाठी केंद्र सरकारने २०१० मध्ये हत्ती टास्क फोर्स (ETF) ची स्थापना केली. हत्तींची लोकसंख्या आणि अधिवास यांच्या भूमि-दृश्यस्तरावर सहयोगी व्यवस्थापनावर भर देऊन, टास्क फोर्सला आशा होती की भविष्यात योग्य जमीन-वापराचे नियोजन आणि मानव-हत्ती संघर्ष कमी करण्यासाठी शमन प्रणाली पुन्हा सक्रिय करून हत्तींचे संवर्धन योग्य रीत्या होऊ शकते. २०१० साली एलिफंट टास्क फोर्सच्या गज रिपोर्टमध्ये ८८ सक्रिय वन्यजीव कॉरिडॉर्सची नोंद केली गेली. २०१७ साली राईट ऑफ पॅसेजचा अहवाल प्रकाशित केला ज्यात भारतातल्या चार हत्ती-व्याप्तप्रदेशांमधल्या (उत्तर, ईशान्य, मध्यपूर्व आणि दक्षिण) १०१ कॉरिडॉर्सची नोंद आणि माहिती सविस्तर मांडली गेली.

प्रोजेक्ट एलिफंट आणि भारतीय वन्यजीव संस्थानाने २०२३ मध्ये वन्यजीव कॉरिडॉर्सवर एक अद्ययावत अहवाल प्रकाशित केला ज्यामध्ये राज्य वनविभाग आणि वन्यजीव तज्ज्ञांनी केलेल्या निरीक्षणे आणि संशोधनावर आधारित १५० कॉरिडॉर्स नमूद केले आहेत. या सुमारे १२६ राज्यांतर्गत तर १९ आंतरराज्यीय कॉरिडॉर आहेत जे दोन किंवा अधिक राज्यांमध्ये विस्तारलेले आहेत. भारत आणि नेपाळमध्ये ६ आंतरराष्ट्रीय कॉरिडॉर आहेत. हत्ती-व्याप्तप्रदेशांमध्ये, जवळजवळ ५२ कॉरिडॉर पूर्व-मध्य प्रदेशात, ४८ ईशान्य प्रदेशात तर भारतातील हत्तींची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या दक्षिणेकडील प्रदेशात ३२ कॉरिडॉर आहेत. महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये जेथे हत्ती नव्याने दाखल होत आहेत, तिथले कॉरिडॉर अद्याप लक्षात घेतलेले नाहीत.

हत्तींसारख्या प्राण्याला जे त्यांच्या निवासस्थानासाठी मोठे भूप्रदेश व्यापतात त्यांना संवर्धनासाठी भू-आधारित धोरणांची आवश्यकता असते. राज्य वनविभागांचा सक्रिय सहभाग, संशोधक आणि तज्ज्ञांनी केलेले संशोधन, नवीन वैज्ञानिक तंत्रज्ञान आणि मजबूत धोरणे यांच्यामुळे भारतातील संवर्धनाच्या प्रयत्नांना यश मिळत आहे. हत्तींचा अधिवास आणि कॉरिडॉरच्या संरक्षणासाठी भारतात ३३ हत्ती प्रकल्पांची निर्मिती (elephant reserves) आणि हत्ती संवर्धन योजना विकसित करणे हे हत्तींच्या संवर्धनाच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

⌘⌘⌘

**Contact -** Wildlife Institute Of India, Chandrabani, Dehradun 248001 **Ph** 9004475561

## विक्रम विनय भावे लिखित पुस्तक 'दाभोळकर हत्या व मी'

विक्रम विनय भावे, वरसई, रायगड येथील सुप्रसिद्ध वैद्य विनय भावे यांचा एकुलता एक मुलगा. वैद्य विनय भावे यांचा आयुर्वेदिक औषधे बनविण्याचा कारखाना होता त्यामुळे घरची आर्थिक सुबत्ता होती. पण विक्रमला देव, देश आणि धर्म याकरता कार्य करण्याची ओढ होती. त्यामुळे तो वयाच्या १८ व्या वर्षीच पूर्णवेळ कार्यरत असलेल्या आध्यात्मिक व हिंदुत्वाचे कार्य करणाऱ्या संस्थेत पूर्णवेळ कार्यरत झाला. संस्थेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकाच्या सेवेत तो अल्पावधीतच रुळला. शांत, मितभाषी विक्रमला भजन गाण्याची विशेष आवड त्यामुळे दिवसभराचं कार्य आटपल्यावर कधीतरी रात्री भजनांची मैफिल जमायची. सर्व काही छान सुरू असतानाच २००८ मध्ये ठाणे येथील गडकरी रंगायतन येथे झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी त्याला अटक झाली. एखाद्या बॉम्बस्फोट प्रकरणी विक्रमला अटक होणे यावर विश्वास ठेवणेच अशक्य होते.




विक्रमला अटक झाली त्यावेळी त्याची पत्नी गर्भवती होती व त्यानंतर २० दिवसानंतर त्याला कन्यारत्न प्राप्त झाले. २००८ ते २०१२ पाच वर्ष विक्रम कारागृहात होता. याच दरम्यान मुंबईतील आर्थर रोड जेलमध्ये त्याची भेट मालेगाव बॉम्बस्फोटातील कथित आरोपी कर्नल पुरोहित, मेजर उपाध्याय, समीर कुळकर्णी, सुधाकर चतुर्वेदी यांच्याशी झाली. जवळपास वर्षभर ते सोबत होते. यादरम्यान त्यांनी सांगितलेले त्यांचे अनुभव व त्यांना मालेगाव केसमध्ये कसे गोवण्यात आले याबाबत माहिती दिली. विक्रमने या माहितीच्या आधारे 'मालेगाव बॉम्बस्फोटामागील अदृश्य हात' हे पुस्तक २०१३ सालीच लिहिले आहे.

२०१९ मध्ये दाभोळकर हत्या प्रकरणात विक्रमला पुन्हा अटक करण्यात आली. दाभोळकरांच्या हत्या प्रकरणात रेकी केल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला होता. या प्रकरणात दोन वर्ष तो येरवड्याच्या तुरुंगात होता. यादरम्यान २०२१ मध्ये त्याच्या वडिलांचा मृत्यू झाला. विक्रमने वडिलांच्या मृत्यूच्या अंतिम संस्काराकरता उपस्थित राहता यावे म्हणून न्यायालयाकडे अनुमती मागितली होती, परंतु ती त्याला मिळाली नाही. काही महिन्यांपूर्वीच दाभोळकर हत्या प्रकरणामधून त्याची निर्दोष मुक्तता झाली. गडकरी बॉम्बस्फोटाचे भिजतचं घोंगडं अजूनही तसंच आहे. नजीकच्या काळातच त्याची अंतिम सुनावणी होऊन त्या प्रकरणातून देखील त्याची निर्दोष मुक्तता होईल याबाबत शंका नाही.

या दोन्ही प्रकरणात विक्रम जवळपास ७ वर्ष कारागृहात होता. तरुणपणाच्या उमेदीच्या काळात राष्ट्र व धर्माकरिता त्याला खूप कार्य करता आले असते, परंतु ती ७ वर्षे अक्षरश: वाया गेली. मुलीचा जन्म झाला त्यावेळेस तो कारागृहात असल्याने मायेचा हात देखील आपल्या मुलीच्या डोक्यावरून तो फिरवू शकला नव्हता. वडिलांचे अंतिम संस्कार तो करू शकला नव्हता. हिंदुत्वाचे कार्य करण्याची फार मोठी किंमत विक्रमला मोजावी लागली.

दाभोळकर हत्या प्रकरणात त्याला कशाप्रकारे गुंतविण्यात आले व त्याचे कसे हाल करण्यात आले यावर त्याने 'दाभोळकर हत्या व मी' हे पुस्तक नुकतेच लिहिले आहे.

त्याचा फोटो पाहून २००८ सालापासून ज्या हाल अपेष्टा त्याने व त्याच्या कुटुंबीयांनी भोगल्या आहेत त्याचा लवलेशही त्याच्या प्रसन्न चेहऱ्यावर दिसून येत नाही. वीस वर्षांपूर्वी विक्रमच्या चेहऱ्यावर जसा आनंद होता आजही तसाच तो टिकून आहे व याचे एकमेव कारण म्हणजे त्याची सुरू असलेली आध्यात्मिक साधना.

कोल्हापूर, सातारा, पुणे, मुंबई येथे त्याने लिहिलेल्या 'दाभोळकर हत्या व मी' या पुस्तकाचे प्रकाशन समारंभ झाले आहेत. २०१३ साली विक्रम भावे यांनी लिहिलेले 'मालेगाव स्फोटामागील अदृश्य हात' हे पुस्तकही अवश्य वाचा.

विक्रम भावे यांच्या ०९४२२२४४४६३ या क्रमांकावर संपर्क करून आपण पुस्तकांसंदर्भात महिती घेऊ शकता. ही दोनही पुस्तके ॲमेझॉन व बुकगंगा या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत.

**आवाहन** सर्व भावे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना विनंती की, त्यांनी आपल्या कुटुंबियांपैकी कोणाचेही विशेष प्राविण्य, सत्कार, गौरव, वाढदिवस अथवा महत्त्वाच्या पदावर नियुक्ती इत्यादी प्रकारची कोणतीही महत्त्वाची घटना त्या प्रसंगाच्या फोटोसह bhave1956@gmail.com या मेलवर पाठवावी, किंवा अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या भ्रमणध्वनीवर Whats App वर पाठवावी म्हणजे त्याचे वृत्त पुढील अंकात समाविष्ट करता येईल. अशा वृत्तांमुळे आपल्या आनंदात सर्वच भावे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना सहभागी होता येईल.

'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक सर्व भाव्यांना व माहेरवाशिणींना कोणतीही वर्गणी न घेता पाठवला जातो. अंक पाठविण्याचा संमेलनाची वर्गणी, आजीव सदस्यत्त्व किंवा स्वनिधीला दिलेली रक्कम याचेशी कोणताही संबंध नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. म्हणजेच आपण सदस्यत्त्व, स्वनिधीची रक्कम द्यावीच, पण 'भावे-प्रयोग' हा प्राजक्तचा अंक आला नाही तरी जरूर कळवावे. अंक शिल्लक असल्यास नक्की पाठविला जाईल. आपला बदललेला पत्ता, फोन नंबर व मेल ॲड्रेस खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवावा किंवा फोनवर कळवावा, म्हणजे सर्व मेलिंग लिस्टमधे तो अद्ययावत होईल. 'भावे-प्रयोग'या भावे मित्र मंडळाच्या प्राजक्तच्या अंकासाठी साहित्यही या पत्त्यावर पाठवावे. **भावे मित्र मंडळ, द्वारा एल.डी. भावे अँड सन्स १२४४, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४.**

# भावे मित्र मंडळ, एक परिवाराचा सदस्यत्त्व आणि स्वनिधीचा उपक्रम.

**'भावे मित्र मंडळ-एक परिवार'** ही संस्था २००६ मध्ये नोंदणीकृत झाली असून संस्थेचे सदस्य होण्यासाठी १८ वर्षांवरील सर्व कौशिक गोत्री चित्पावन भाव्यांनी मंडळाचे सदस्यत्व स्वीकारावे असे आवाहन भावे मित्र मंडळाकडून वेळोवेळी केलेले आहे. याला प्रतिसाद म्हणून अनेकांनी अगदी लहानग्या मुलांसह सदस्यत्व स्वीकारले आहे. **डिसेंबर २०१८ मध्ये उज्जैनला झालेल्या संमेलनातील निर्णयामुळे सदस्यत्त्वाची रक्कम आता एक हजार रुपये झाली आहे.**

जुलै, २००८ मध्ये झालेल्या भावे मित्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत भावे मित्र मंडळाचे कार्य पुढे नेण्यासाठी संस्थेचे सदस्य वाढविणे व स्वनिधी वाढविण्याबाबत खालील निर्णय झाले. १) शिक्षण व तत्सम सहकार्य. २) व्यावसायिक सहकार्य/व्यवसायाकरिता कमी व्याजदरात भांडवल पुरविणे. ३) वैद्यकीय कारणांसाठी सहकार्य, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी मदत (परत बोलीच्या तत्वावर). ४) आपत्कालीन सहकार्य अशा कारणांसाठी आणि भावे मित्र मंडळाच्या कार्यालयीन व्यवस्थापनासाठी स्वनिधी जमवावा असे ठरले. **प्रत्येक कमावत्या व्यक्तीने रु. ५०००/- स्वनिधीसाठी द्यावेत** असे आवाहन केले गेले. यापेक्षा अधिक रक्कम दिल्यास स्वागतच आहे असेही आवाहन कार्यकारिणीने केले होते. त्यानुसार अनेकांनी स्वनिधीसाठी भरघोस निधी देऊन चांगला प्रतिसाद दिला. अनेकांनी एक रकमी रु.५०००/- देण्यास असमर्थता दर्शवल्याने रक्कम हप्त्याने स्वीकारण्याचीही योजना समोर आली.

भावे मित्र मंडळाचे अध्यक्ष, श्रीवर्धन वामन भावे यांनी प्रत्येक भावे कुटुंबाकडून रु. १०००/-(रु. एक हजार फक्त) वार्षिक वर्गणी दरवर्षी घ्यावी असा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावाला अभय शंकर भावे यांनी अनुमोदन दिले. कुलबंधूंचे उपलब्ध असलेले संपर्क पाहता तीन हजारांपेक्षा अधिक कमावत्या व्यक्ती आहेत. **या आवाहनास मान देऊन अनेकांनी सदस्यत्त्व स्वीकारले आहे, तसेच स्वनिधीही दिलेला आहे.**

**आपणही सदस्यत्त्वाची रक्कम रुपये एक हजार व वार्षिक वर्गणी रुपये एक हजार देऊ शकता. खाली दिलेल्या बँक अकाऊंटमध्ये रक्कम ट्रान्सफर करावी अशी विनंती आहे.**

**बँकेचे डिटेल्स याप्रमाणे आहेत. Bank Name** - IDBI Bank, **Branch** - Deccan Gymkhana, Pune. **Account Name** - Bhave Mitra Mandal, **Saving A/C Number** - 50210010010723, **IFSC** - IBKL0000502. **रक्कम ट्रान्सफर केल्यावर अभय शंकर भावे यांना ९४२२३०६०३३ या क्रमांकावर किंवा** bhave1956@gmail.com **या मेलवर संपूर्ण नाव व पत्यासह कळवावे म्हणजे पावती पाठवता येईल.**

# भावे मित्र मंडळाचा एक उपक्रम - भावे शिक्षण निधी

भावे मित्र मंडळाच्या बैठकीत शिक्षण निधीच्या वाढीसंबंधी काय करता येईल याबद्दल नेहमीच विचार विनिमय चालू असतो.

पहिला कुलवृत्तांत सन १९४० मध्ये प्रकाशित झाला. त्यानिमित्ताने जो निधी शिल्लक उरला होता, त्या रकमेचा विनियोग कसा करावा या विचारातून भावे शिक्षण निधीची कल्पना पुढे आली. अनेक कुलबंधूंचे पाठिंब्याने 'भावे शिक्षण निधी'ची स्थापना झाली. जवळजवळ सत्तर वर्षे हे कार्य पहिला कुलवृत्तांतकर्ते गोविंद वासुदेव भावे व त्यांचे सहकारी, पुढे त्यांचे चिरंजीव मधुसूदन गोविंद भावे यांनी चालवले. भावे मित्र मंडळाची स्थापना झाल्यावर २००८ साली भावे शिक्षण निधी हा भावे मित्र मंडळात समाविष्ट झाला. त्यानंतर कामास थोडा वेग आला. आता मंडळाच्या त्रैमासिकातून दरवर्षी निवेदन दिले जाते व भावे कुलोत्पन्न गुणवान विद्यार्थ्यांना पुरस्कार, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. असे असले तरी अजून मोठ्या प्रमाणात या निधीमध्ये भर पडल्यास, वाढत्या महागाईच्या काळात वाढलेल्या शिक्षण खर्चाची तोंडमिळवणी करणे शक्य होईल.

भावे शिक्षण निधीतून आजवर अनेक विद्यार्थ्यांना मदत मिळाली आहे. ही मदत 'फूल ना फुलाची पाकळी' अशा स्वरूपाची आहे हे मान्य केले तरी विद्यार्थ्यांना त्या त्या वेळी जी मदत झाली आहे त्याबद्दल अनेकांना कृतज्ञता वाटते व ते स्वाभाविकही आहे. ही मदत थोडी असली तरी आपल्या कुलाने प्रेमाने व आपुलकीने दिलेला तो प्रोत्साहनपर आशिर्वाद आहे ही भावना अनेक कुलबंधूंशी बोलताना लक्षात आली.

**ही भावना लक्षात घेता ज्या भावे कुल बंधू भगिनींना अशी मदत अल्पस्वल्पही का असेना, मिळाली आहे त्यांचेसाठी विनंती वजा आवाहन करीत आहोत की आता जे कुलबंधू आर्थिकदृष्ट्या स्थिरावले आहेत त्यांनी 'भावे शिक्षण निधी'स सहाय्य करून हा निधी वाढवण्याचे कामी पुढाकार घ्यावा. एक कल्पना अशी आहे की प्रत्येकाने दरवर्षीची योजना निश्चित करून तशी रक्कम तयार ठेवून ही रक्कम 'भावे शिक्षण निधी'स देणगीचे स्वरूपात द्यावी. आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने, लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने किंवा भावे मित्र मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्तानेही अशी योजना आपणास तयार करता येईल.**

अर्थात ज्यांनी विद्यार्थीदशेत या निधीतून काही सहाय्य घेतलेले नाही अशांनीही शिक्षण निधीस सहाय्य करण्यासाठी हे निवेदन आहे हे सांगणे नकोच. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे हा निधी वाढीला लागेल असा विश्वास वाटतो. सर्वांनी मनावर घेतले तर हे काम सोपे होईल. 'केल्याने होत आहे रे ! आधी केलेचि पाहिजे !' अधिक काय लिहावे!

**अध्यक्ष, भावे मित्र मंडळ**

**शिक्षण निधीच्या देणगीची रक्कम आपल्याला बँकेच्या खात्यात डायरेक्ट जमा करता येईल. त्याचा तपशील खाली दिला आहे.**

**Bank Name** - Janata Sahakari Bank, **Branch** - Karve Road, Pune., **Account Name** - Bhave Mitra Mandal (Ek Pariwar) A/C Bhave Shikshan Nidhi, **Saving - A/C Number** - 007220100038846, **IFSC Code** - JSBP0000007

**रक्कम ट्रान्सफर केल्यावर पर्शराम भावे (९४०३५१६८७५) किंवा अभय भावे (९४२२३०६०३३) यांना कळविणे आवश्यक आहे.**

## परदेशी 'विराट' वृक्ष!

© डॉ. सरिता विनय भावे, मुंबई.

छायाचित्र क्रेडिट

श्री. विनय भावे, डॉ. सरिता, श्रीमती आशा दावडा, संदर्भ

वड, पिंपळ, औदुंबर या देववृक्षांना मऱ्हाटी जनमानसाच्या अंतरात्म्यात धार्मिक स्थान लाभले आहे; तर प्राजक्त, सोनचाफा, बकुळ या झाडांची फुले त्यांच्या मर्मबंधातील ठेव आहेत. आम्रवृक्षाच्या राजसी व्यक्तिमत्त्वाच्या माधुर्याने ते मोहून जातात; तर बहाव्याच्या झगझगीत लावण्याने ते दीपून जातात. नुसतेच नाव ऐकून माहीत असलेल्या आणि प्रत्यक्षात कधीच न पाहिलेल्या सीता अशोकाच्या झाडाने तर अचानक पुढे ठाकून मला काही क्षण बावचळूनच टाकले होते, ते मी आजतागायत विसरू शकलेले नाही. या झाडा-वृक्षांचे एक मात्र विशेष आहे हं, स्वत: एकाच जागी स्थिर राहूनही, कधी येऊन आपल्या मनात घर करून जातात, आपल्याला जाम पत्ता लागत नाही! वर उल्लेखलेली ही सर्व मंडळी (आणि त्यांचे इतर भाऊबंद) आपल्या मातीतील असल्याने त्यांच्याशी आपले भावबंध प्रस्थापित होणे, त्यांचे आपल्याला आकर्षण असणे अगदी साहजिक आहे. परंतु केवळ बाह्य स्वरूपाद्वारे जगभराचे लक्ष स्वत:कडे वेधून घेणारा एक परदेशी वृक्ष आहे; ज्याचे नाव ऐकताच आपले कान टवकारले जातात आणि डोळे विस्फारले जातात. 'लौकिकार्थाने तुमचा नसलो, आपली तुपली सोयरीक जुळली नाही तरी निदान बौद्धिक पातळीवर का होईना माझ्याबद्दलही जाणून घ्या', असे जणू तो ठासून सांगतो आहे ('आर्जवे करतो आहे' असे म्हणणे त्याच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वाला शोभून दिसणार नाही!) असे त्याच्याकडे पाहिल्यावर भासते. या महाभागाची ही इच्छा टाळण्याचा उपमर्द 'म्या पामरा' कडून घडणे प्रत्यक्ष भगवंतालाच मान्य नसल्याने त्यानेच मला याच्या पुढ्यात उभे केले! हे नेमके कसे घडले ते आधी सांगते!

२०१९ साली सातारा जिल्ह्यातील, वाई तालुक्यातील, मेणवली येथील नाना फडणवीस यांचा वाडा बघून आम्ही मैत्रिणी परतत होतो. परतताना मला समोरच्या झाडावर काहीतरी चकाकणारे लटकलेले दिसले. मला आधी वाटले, दिवाळीत बनवतात तसा चंदेरी कागदाचा छोटासा आकाशकंदील आहे की काय (पण आकाशकंदील जून महिन्यात, शिवाय झाडावर कसा येईल?!). जवळून पाहिल्यावर समजले की माझ्या मनातील तो छद्म आकाशदिवा प्रत्यक्षात पांढरे फूल असून उन्हाच्या तिरीपेत तेच चांदीसारखे चमचमत आहे! हरखून जाऊन, फुलाला मनसोक्त न्याहाळून, त्याचे यथासांग कौतुक केल्यावर शेवटी माझे लक्ष त्या झाडाच्या बुंध्याकडे गेले! अबब....केवढा त्याचा तो विस्तार! विराट, अजस्त्र, विशाल, भरभक्कम ही विशेषणे खऱ्या अर्थाने शोभून दिसतील अगदी असा होता तो. सद्यस्थितीतील आम्ही काही परकऱ्या पोरींसारख्या नाजूक (हं, गेले ते दिन गेले!) नसून चांगल्या खात्यापित्या घरच्यासारखा वाटतो. असे



असून सुद्धा आम्ही त्याच्या पुढे चिमुरड्या वाटत होतो, म्हणजे बघा! मग मात्र अस्मादिकांची ट्यूब पेटली (पहिल्यापासून असेच आहे, खटकन कळ दाबली अन् पटकन दिवा पेटला असे घडतच नाही! आधी जराशी फडफड होऊन मगच आमची ट्यूब उजळते!) की हा महाकाय वृक्ष तर 'बाओबाब' आहे! आणि मग काय विचारता! बोळा काढल्यावर तुंबलेल्या पाण्याची धार कशी झरझर वाहू लागते, तशी माझी स्मरणशक्ती एकदम सुसाट धावायला लागली. तिला लगेच आठवले, आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित आणि शाहरुखखान अभिनीत स्वदेस (२००४) चित्रपटातील पंचांच्या गावकऱ्यांबरोबरच्या बैठकीच्या एका महत्त्वाच्या प्रसंगात, ज्या भल्यामोठ्या झाडाचा पार आपल्याला दिसतो तो हाच दस्तुरखुद्द वृक्ष! तुम्ही म्हणाल, हे महादेवा! कुठलाही विषय असो, या बाईला लगेच चित्रपटांचेच संदर्भ कसे सुचतात?! आता असे पहा, जगभरात सर्वसामान्य भारतीय जनतेचे व्यवच्छेदक लक्षण - त्यांना असलेले चित्रपट, क्रिकेट आणि राजकारण या त्रयीचे अतोनात असलेले वेड (ज्यांचा क्रम वैयक्तिक आवडीनुसार पुढे मागे होतो) हे मानले जाते! मी सुद्धा याच सर्वसामान्य भारतीय जनतेचे प्रतिनिधीत्त्व करत असल्याने आणि माझ्या बाबतीत या त्रयीपैकी चित्रपटांचा 'लंबर' पहिला लागत असल्याने मला त्या संबंधित संदर्भच पटकन आठवतात! असो. तर आपण बोलत होतो बाओबाब बद्दल....


बाओबाब दीर्घकाळ जगणारा पानझडीचा वृक्ष असून ऊंची ५ ते ३० मीटर (१५ ते १०० फूट), भरपूर उंचीला शोभेसे रुंद खोड आणि टोकाशी असणारा संक्षिप्त पर्णसंभार ही याची वैशिष्ट्ये आहेत. वर्षातील जवळजवळ सहा महिने हा वृक्ष पाने विरहितच असतो, म्हणूनच याची उघडीबोडकी किंवा तुरळक पाने असलेली छायाचित्रे बहुतांश वेळा पहायला मिळतात. हा वृक्ष मूलत: मादागास्कर (पूर्व आफ्रिकेतील देश) इथला असून आता इतर आफ्रिका खंडात, अरबी द्वीपकल्प, ऑस्ट्रेलिया आणि भारतात सुद्धा याच्या प्रजातींची लागवड होते. भव्य बाओबाब वृक्ष आफ्रिकन खंडाचे एक प्रतिष्ठित मानचिन्हच आहेत. स्थानिक समाज ही प्रजाती पृथ्वीतलावर मानवाच्याही पूर्वापार, २० कोटी वर्षांपासून अस्तित्वात आहेत असे मानतो. बाओबाबची झाडे आफ्रिकेतील सव्हाना या संपूर्ण कोरड्या गवताळ प्रदेशाच्या परिसंस्थेसाठी पायाभूत गरजेची आहेत. ती मातीची आर्द्रता टिकवून ठेवण्यास मदत करतात, पोषक तत्वांचा पुनर्वापर करण्यास मदत करतात आणि त्यांची जमिनीखालची अवाढव्य मूळसंस्था मातीची धूप कमी करण्यास मदत करते. ही झाडे पावसाळ्यातील पाणी त्यांच्या मोठ्या खोडात शोषून घेतात आणि साठवतातही. यामुळे साहजिकच कमी पाण्याच्या हंगामात ही झाडे पक्षी, सरडे, माकडे आणि अगदी हत्तींसह विविध जीवन प्रकारांसाठी निवारा, अन्न आणि पाणी यांचे एक आवश्यक स्त्रोतच बनतात. ही प्रचंड झाडे त्यांच्या अनेकविध उपयोगांमुळे इथल्या देशी उपचार, परंपरा आणि लोककथांचा महत्त्वाचा हिस्सा बनली आहेत. त्यांच्या या सर्व वैशिष्ट्यांमुळे त्यांना 'Tree of Life' असे सार्थ टोपणनावही मिळाले आहे. आपल्या देशात वड, पिंपळ या वृक्षांचे जे धार्मिक स्थान आहे, तसेच सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व अनेक आफ्रिकन समाजांमध्ये बाओबाब वृक्षांना आहे. शतकानुशतके स्थानिक जनता या भव्य झाडांसोबत सुसंवादीपणे जगणे शिकली आहेत. दीर्घकाळापासून त्यांचे सामुदायिक जीवन या झाडांभोवती केंद्रित झाले






असून तिथे सुद्धा सांप्रदायिक मेळावे, कथाकथन आणि धार्मिक विधींसाठी या झाडांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यावरून झाडे आणि मानव यांचे एकमेकांशी असलेले नाते वैश्विक पातळीवर सारख्याच व्याप्तीचे असते हेही अधोरेखित होते.


१४ व्या शतकातील अरबी यात्री आणि विद्वान इब्न बटूटा यांना सर्वप्रथम या वृक्षाचे वर्णन लिहून ठेवल्याचे श्रेय दिले जाते. अरेबिक भाषेतील 'अबु-हीबाब' (अनेक बियांचे झाड) या नावाचा इजिप्शियन भाषेत 'बाहोबाब' असा उच्चार होऊन सध्याचे जास्त प्रचलित 'बाओबाब' असे या झाडाचे नाव आले असावे. यावरून अनेक म्हणजे बहू - बाहो - बाओ अशी याची व्युत्पत्ती असू शकेल का, अशी उगाच माझ्या भारतीय मनात आलेली शंका! 'Father of Many Seeds' असे सुद्धा याच्या नावाचे भाषांतर होऊ शकते. एका संदर्भात बाओबाब या आफ्रिकन नावाचा अर्थ 'ज्येष्ठवर्य' असल्याचेही म्हटले आहे. माकडे आवडीने याची फळे खातात त्यावरून 'मंकी ब्रेड ट्री', मोठ्या बाटलीसारखा तळाचा घेर मोठा आणि वरचा भाग निमुळता म्हणून 'बॉटल ट्री' (मादागास्कर येथील बाओबाब वृक्षांना बाटलीसारखा आकार असतो), फळात विशेषत्वाने आढळणाऱ्या टार्टारिक आम्लामुळे (जे आपल्याकडील चिंचेत सुद्धा विशेषत्वाने आढळते) 'क्रीम ऑफ टार्टर ट्री' अशी विविध नावे याला इंग्रजी भाषेत आहेत. असे मानले जाते की उंच उंच वाढायला लागल्यावर या वृक्षांनी (सूर्यप्रकाश अडवून) लहान वनस्पतींवर आपला धाक गाजवायला सुरुवात केली. त्यांच्या या गर्विष्ठ वर्तनाने देव क्रुद्ध झाले आणि शिक्षा म्हणून यांना जमिनीतून उपटून उलटे लावले. त्यामुळे त्यांचे असे फांद्या मुळांसारखे दिसणारे स्वरूप निर्माण झाले. बाओबाब बद्दलची अरेबियन आख्यायिका अशी आहे की 'सैतानाने बाओबाबला उपटले, त्याच्या फांद्या जमिनीत गाडल्या आणि त्याची मुळे हवेत उघड्यावर टाकली'. या दंतकथांवरून त्याला 'अपसाईड डाऊन ट्री' असेही संबोधतात.





मुंबईतील भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानाच्या प्रवेशद्वाराजवळील बाओबाब वृक्ष

गेली अनेक शतके भारतात याचे वास्तव्य आहे आणि अरबांनी व्यापारादरम्यान तो भारतात आणल्याचे मानले जाते. मुंबईतील भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानातील (राणीचा बाग/भायखळा झू) प्रवेशद्वाराजवळील याचे दोन महाकाय वृक्ष पर्यटकांसाठी विशेष आकर्षण ठरतात. महाराष्ट्रातील वाई आणि मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यातील मांडू गावाच्या पंचक्रोशीत याचे वृक्ष प्रामुख्याने आढळतात. मांडू परिसरात साधारण हजार तरी याचे वृक्ष असावेत. संस्कृत भाषेत गोरक्षी, सर्पदंडी; हिंदीत ख़ुरासानी इमली, गोरख इमली; मराठीत गोरख चिंच, गोरक्ष चिंच; गुजरातीत गोरख आमली, रुखडो; बंगालीत गाधा गाछ; कानडी भाषेत आनी हुणीसे, मुगीमावू, ब्रम्हाम्लिका; तेलुगु भाषेत ब्रह्माम्लिका; तामिळ भाषेत पप्परपुली या नावांनी हा भारतात ओळखला जातो. गोरख हा संस्कृत 'गोरक्षी'चा अपभ्रंश आणि चिंचेप्रमाणे आंबूस यावरून चिंच ही उपाधी भारतीय नावात अंतर्भूत केलेली दिसते. गोरख चिंचेखाली बसून गोरक्षनाथांनी शिष्यांना विद्यादान केले, म्हणून याला गोरख चिंच हे नाव पडल्याचे सांगितले जाते. मायकेल ॲडॅन्सन (आडांसाँ) या अठराव्या शतकातील फ्रेंच निसर्ग शास्त्रज्ञाने सर्वप्रथम या वृक्षाचा वनस्पतीशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास केल्यामुळे त्याच्या सन्मानार्थ या वृक्षाला *Adansonia digitata* (ॲडॅन्सोनिया डिजिटॅटा, कुल-बॉम्बॅकेसी) हे शास्त्रीय नाव देण्यात आले. हाताच्या बोटासारख्या पानाच्या खंडांवरून जातिवाचक (Species) नाव डिजिटॅटा पडले आहे. स्वत: ॲडॅन्सन यांनी पाहिलेल्या वृक्षाचे वय ५,००० वर्षे असावे असा अंदाज केला असला तरी आतापर्यंत रेडियो कार्बन डेटिंग पद्धतीने विविध देशांतील बाओबाब वृक्षांचे वय साधारण हजार, दीड हजार, दोन ते अडीच हजार वर्षे इतके मोजले गेले आहे.



या वृक्षाच्या बुंध्याचा परीघ जगात पहिल्या क्रमांकाचा भव्य म्हणजे ३० मी. पर्यंत (१०० फूट) असू शकतो. खोडाचा जाड पापुद्रा राखाडी रंगाचा असतो. खोडामध्ये अगदी ६०,००० लीटरपर्यंत पाणी साठवले जाऊ शकते. त्यामुळे पाणी कमी असलेल्या प्रदेशात सुद्धा हे वृक्ष तग धरतात आणि वाढीचा हंगाम आल्यावर नवीन पानांना झपाट्याने पाणी पोचवण्यासही मदत होते. ही झाडे अग्नी आणि वाळवीला सुद्धा अत्यंत प्रतिरोधक आहेत. मऊपणामुळे याचे लाकूड फक्त आगपेट्यांच्या कारखान्यात उपयुक्त आहे. सालीतील धागा दोऱ्या, पिशव्या व जाड्याभरड्या कापडास आणि चलनी नोटांच्या चिवट कागदास उपयुक्त असतो. डिंक पाळीव जनावरांच्या व उंटांच्या जखमांना लावतात. बाओबाबची पाने हस्ताकृती, संयुक्त, ५ ते ७ मोठ्या दलांची व लांब देठाची असतात. याची सुकलेली पाने स्वेदक (घाम आणणारी) आणि मूत्रपिंड विकारावर उपयुक्त असतात.




गोरख चिंच संदर्भ २
१) वृक्ष (दुरून दिसलेला, पाने झडलेला व फळे असलेला)
२) फूल व पाने असलेली फांदी.
३) फळ.

बाओबाब वृक्षाची काही लक्षणे माल्व्हेसी कुलाप्रमाणे (जास्वंदी) आहेत परंतु काही महत्त्वाचे फरक असल्यामुळे याचा समावेश हल्ली बॉम्बॅकेसी उपकुलात केला जातो. बाओबाबची फुले एकाकी (कधी दोन किंवा तीन

एकत्र सुद्धा), मोठी (१५ सेंमी. व्यासाची), पांढरी, मांसल, पाच पाकळ्यांची असून, लांब देठाने झाडावर लटकत राहतात. फुलांत असंख्य पुंकेसर असणारे परागदल एकसंध असते. सुवास असलेली फुले रात्री फुलतात. चोवीस तासाच्या आतच फुलांच्या पाकळ्या आतल्या बाजूला जरा दुमडल्या जातात. मर्यादित प्रजननकाल असलेल्या फुलांचे वटवाघळांमार्फत परागीभवन झाल्यावर फुले गळून तेथे मोठी, लोंबती, राखाडी रंगाची, लवदार, कठीण (मृदुफळ, घनकवची), दुधी भोपळ्यासारखी दिसणारी फळे येतात. ही सुकी फळे मासेमारीच्या वेळी कोळ्यांच्या जाळ्यांना तरंगण्याकरिता बांधतात. फळातील बिया अनेक, पिंगट, मूत्रपिंडाकृती व आंबूस मगजात (गरात) विखुरलेल्या असतात. फळातील टार्टारिक आम्ल आणि क जीवनसत्व (व्हिटॅमिन सी) यांची रेलचेल असलेला पौष्टिक मगज मधुर व थंड सरबताकरिता वापरतात, तसेच तो तापात प्रशीतक असतो. त्यात शामक, स्तंभक (आकुंचन करण्याचा) व रेचक गुण आहेत. आधी उल्लेख केल्याप्रमाणे मांडू येथे प्रकर्षाने आढळणाऱ्या बाओबाब वृक्षांचे यांची फळे, बिया विकून उपजीविका करणाऱ्या इथल्या भिल्ल आदिवासी जमातीने आजतागायत संवर्धन केले आहे. मध्य प्रदेश सरकारने या 'मांडू की इमली' फळाला देशभरात चांगली ओळख मिळावी, आदिवासी आणि शेतकऱ्यांना आर्थिक फायदा व्हावा आणि या दुर्मिळ झाडाचे संरक्षण व्हावे या कारणांस्तव बाओबाबच्या फळासाठी जीआय टॅग (GI tag, भौगोलिक संकेत) साठी अर्ज सादर केलेला आहे.



मांडूच्या बाजारात बाओबाबची फळे आणि बिया विकणारी महिला

आपल्या आकारमानामुळे, आयुर्मानामुळे, फळांमुळे आणि सालामुळे अद्वितीय ठरलेला बाओबाब वृक्ष सध्या मात्र जगभरातील हवामान बदलामुळे आणि तापमानवाढीमुळे अधिक संवेदनक्षम बनला आहे. शास्त्रज्ञांच्या मते बाओबाबच्या प्रजाती पुढील हजारो वर्षांपर्यंत जगत आणि भरभराट करत राहण्यासाठी जागतिक पातळीवरील एकत्रित पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक अभ्यासाची गरज आहे. रस्त्याच्या दुतर्फा लावण्यास हा वृक्ष गैरसोयीचा असला तरी मोठ्या बागेत अथवा देवळाच्या आवारात लावलेला आढळतो. फुललेला असताना अतिशय भव्य दिसतो. असा हा बाओबाब वृक्ष साहित्य जगतात सुद्धा डोकावून गेला आहे. "The Little Prince' या आपल्या सुप्रसिद्ध पुस्तकात फ्रेंच लेखक अँटोन डी सेंट - एक्झुपेरी यांनी लहानगा राजपुत्र त्याच्या पिटुकल्या ग्रहावर वाढण्याचा प्रयत्न करणाऱ्या बाओबाब्सना वेळीच उपटण्याची काळजी घेतो, असे दाखवले आहे. बाओबाबची भीतीदायक, मातीला घट्ट पकडून ठेवणारी झाडे, ग्रह नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या नाझीवादाचे प्रतिनिधित्व करतात अशी मीमांसा संशोधकांनी केली होती. मी जेव्हा हे पुस्तक वाचले होते तेव्हा त्या रूपकाचा अर्थ, अवाढव्य वाढणाऱ्या बाओबाबरूपी दुर्गुणांच्या मुळांनी आपल्या अंतरात्मारूपी ग्रहात घट्ट रुतून त्याचा ताबा घेण्याअगोदरच जाणीवपूर्वक त्यांचा प्रादुर्भाव टाळणे/नायनाट करणे योग्य, असा घेतला होता! तर अशा या भारदस्त वृक्षाची माहिती त्याच्या सारखीच अस्ताव्यस्त वाढण्याअगोदर आता आवरते घेणे बरे!

**टीप आणि आभार -** या लेखात मुंबईतील राणीचा बाग, वाई आणि मांडू येथील बाओबाब वृक्षांची छायाचित्रे वापरली आहेत. मादागास्कर येथील बाओबाब वृक्षाचे छायाचित्र श्रीमती आशा दावडा यांच्या सौजन्याने मिळाले आहे. मेधा शास्त्री (बंगाली), देवदर्शिनी (तामिळ) आणि डॉ. गिरीश महाजन (कानडी) यांचे बाओबाब वृक्षाच्या योग्य उच्चारांसाठी विशेष आभार! व्यक्ती असलेली छायाचित्रे त्या त्या व्यक्तींच्या परवानगीने काढली आणि इथे वापरली आहेत.

**संदर्भ –**

1) African baobab tree: how one plant creates an entire habitat
https://www-oneearth-org.translate.goog/species-of-the-week-african-baobab-tree/?_x_tr_sl=en&_x_tr_tl=mr&_x_tr_hl=mr&_x_tr_pto=tc

२) गोरख चिंच - मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती
https://vishwakosh.marathi.gov.in/22518/

३) गोरख चिंच - विकिपीडिया
https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%97%E0%A5%8B%E0%A4%B0%E0%A4%96%E0%A4%9A%E0%A4%BF%E0%A4%82%E0%A4%9A

4) https://en.wikipedia.org/wiki/Adansonia

5) Adansonia digitata – Baobab
http://www.flowersofindia.net/catalog/slides/Baobab.html#:~:text=At%20the%20end%20of%20the,that%20look%20like%20powder%20puffs.

6) The Baobab Trees of Mandu: An African Wonder in India
https://www.outlooktraveller.com/experiences/places-of-interest/have-you-heard-about-the-baobab-trees-of-mandu

7) Answer to What are the most innovative ways trees have evolved to survive dry climates? by Sean Kernan
https://www.quora.com/What-are-the-most-innovative-ways-trees-have-evolved-to-survive-dry-climates/answer/Sean-Kernan?ch=15&oid=183358527&share=5d9f051f&srid=tuYqq&target_type=answer

8) Madhya Pradesh seeks GI tag for the fruit of the endangered baobab in Mandu
https://india.mongabay.com/2023/03/madhya-pradesh-looks-to-obtain-gi-tags-for-endangered-baobabs-in-mandu/

⌘⌘⌘

**संपर्क :** ३०६, डॅफोडिल, नीलकंठ गार्डन, गोवंडी(पूर्व) मुंबई ४०००८८ **भ्रमणध्वनी :** ९८६९०५१८१९

## सहवेदना



**अंजली गोविंद भावे, कल्याण** यांचे अयोध्या येथे दि. १३ मार्च २०२५ ला निधन झाले. कुंभमेळ्यात दर्शन करून त्या अयोध्या येथे श्री रामाच्या दर्शनासाठी गेल्या होत्या व तिथे रामचरणी त्यांना मरण आले. त्यांनी मुंबई महानगरपालिकेतून मुख्य लिपिकपदावरून २०१३ साली स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. त्यांना आध्यात्मिक वाचनाची आवड होती. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, कन्या, जावई असा परिवार आहे.



**शालिनी वासुदेव भावे, इंदूर** यांचे दि. १६ मार्च २०२५ ला निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा आनंद, सून अनघा, नातू अथर्व, नात शिवानी नाईक असा परिवार आहे.

त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

# मराठी साहित्यातील 'कलंदर फकीर' म्हणून ओळखले जाणारे प्रतिभासंपन्न लेखक गो.नी.दांडेकर

**प्रतिनिधी, पुणे –** गो.नी.दांडेकरांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे ८ जुलै १९१६ रोजी झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. दापोली जवळील गुढघे हे त्यांचे मूळगाव, त्यांच्या त्रिपदी या पुस्तकात या गावाचे व आसपासच्या गावांचे वर्णन त्यांनी केले आहे. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी वयाच्या १२ व्या वर्षी गोनीदांनी सातव्या इयत्तेमध्ये शाळा सोडली व पलायन केले. त्यानंतर गोनीदा संत गाडगे महाराजांच्या सहवासात आले. त्यांचे बरोबर बराच काळ ते राहिले व त्यांचे बरोबरच गावोगाव हिंडले.

नंतर गोनीदांनी वेदांताचा अभ्यास करणे सुरू केले. पुढे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते बनले. १९४७ मध्ये गोनीदांनी चरितार्थासाठी लेखन करण्याचा निर्णय घेतला. सातारा जिल्ह्यातील औंध येथे चित्रकार, वेदाभ्यासक, लेखक श्रीपाद सातवळेकर यांच्या औंध येथील कार्यालयात त्यांनी काही दिवस लेखनाचे काम केले आणि त्यांनी पुढील आयुष्यात कुमारसाहित्य, ललित गद्य, चरित्र, कादंबरी, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, धार्मिक, पौराणिक इत्यादी विविध प्रकारचे लेखन केले. गोनीदा दुर्गप्रेमी होते. त्यांनी पायी फिरण्याच्या हौसेतून पन्नास वर्षे दुर्गभ्रमण केले. छायाचित्रणाची हौस होतीच त्यामुळे प्रवासात त्यांनी गडाकोटांची, त्यावरील वास्तूंची व वस्तू यांची असंख्य छायाचित्रे काढली.

त्यांचे बालपण मेळघाटच्या वेशीवर असलेल्या आदिवासी वस्ती असलेल्या परतवाडा येथे असलेल्या जंगलातच गेले. त्यामुळे जंगल व प्राणी यांची ओळख लहानपणापासून होती व त्याचा प्रभाव त्यांचे लेखनावर पडला. गोनीदांना संतसाहित्याची आवड असल्याने लहानपणापासूनच गाडगेबाबा, नंतर अकोल्याचे जगन्नाथ जोशी, पुण्याचे ह.भ.प. सोनोपंत दांडेकर, धुळ्याचे महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक यांच्या सहवासात राहिल्याने त्यांचेवर वैचारिक संस्कार झाले. आळंदीच्या पालखी सोहोळ्याचे कामकाज समितीमध्ये त्यांचा सहभाग असायचा. 'सुलभ भावार्थ ज्ञानेश्वरी', तसेच 'श्री रामायण', 'भक्तिमार्गदीप', 'कर्णायन', 'कृष्णायन', 'दास डोंगरी राहतो', 'तुका आकाशाएवढा' अशी अनेक पुस्तके लिहिली. 'बिंदूची कथा' ही त्यांची पहिली कादंबरी. माचीवरला बुधा, जैत रे जैत, पवनाकाठचा धोंडी, यासारख्या कादंबऱ्यांचे प्रभावी लेखन त्यांच्याकडून झाले. 'जैत रे जैत' 'पवनाकाठचा धोंडी' या कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. 'आम्ही भगीरथाचे पुत्र', 'मोगरा फुलला,' 'पडघवली', 'शितू', 'मृण्मयी' अशा अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या.

'मोगरा फुलला' या कादंबरीत ज्ञानदेवांचे जन्मापूर्वीच्या आपेगाव येथील कुटुंबाचे भावविश्व रेखाटले आहे. संन्यासी वृत्तीचे विठ्ठलपंत व त्यांच्या कुटुंबीयांची सनातन्यांनी केलेली परवड वाचून मन हेलावते. ज्ञानेश्वरांचे वडील म्हणून विठ्ठलपंत यांचे गोनीदांना खूप आकर्षण होते. या कादंबरीचे १९७७ मध्ये प्रथम गोनीदांनीच जाहीर वाचन केले, त्याला वाचकांनी खूप चांगला प्रतिसाद दिला.

त्यांच्या आत्मचरित्रात्मक 'स्मरणगाथा' या पुस्तकाला १९७७ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. पुणे विद्यापीठाने ३० डिसेंबर १९९२ ला सन्माननीय डी. लिट. पदवी त्यांना दिली. वर्ष १९९१ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र गौरव' पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. त्यांचे वास्तव्य तळेगाव येथे असायचे. तळेगाव नगरपरिषदेने 'नगरभूषण', तर द्वारकापीठाच्या शंकराचार्यांनी 'साहित्य वाचस्पती' म्हणून गोनीदांना गौरविले. शिवाय नगर जिल्हा ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयाचा 'नानासाहेब नारळकर' पुरस्कार, कोल्हापूरच्या गिर्यारोहण संस्थेचा 'दुर्गप्रेमी' पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना लाभले. अकोला येथे झालेल्या १९८१ मधील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

दुर्गप्रेमी, अनुभवसंपन्न, सृजनशील रसिक, भाविक, कुशल छायाचित्रकार आणि मराठी साहित्यातील 'कलंदर फकीर' म्हणून ओळखले जाणारे प्रतिभासंपन्न लेखक गो.नी. दांडेकर यांचे १ जून १९९८ रोजी पुणे येथे निधन झाले.

**महत्त्वाची वैधानिक सूचना –** 'भावे-प्रयोग' या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्याचे सर्व लेखनाधिकार त्या त्या लेखकांकडे आहेत. या अंकातील साहित्य अन्यत्र प्रकाशित करण्यापूर्वी त्या त्या लेखकांकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. – संपादक.

**संपादक मंडळ : अभय शंकर भावे, संपादक**
शशिकिशोर दत्तात्रेय भावे, पर्शराम गोविंद भावे,
उदय नारायण भावे. (सल्लागार)

प्राजक्त

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड कोल्हापूर-४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथून प्रसिध्द केले.
**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 8623053750**
**email** - prajakaweekly@gmail.com
RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**
**Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS**